NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

## व्यवस्थापन परिषदेच्या १७९ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

## शुक्रवार, दि. १९ जुलै, २०२४ रोजी सकाळी ११:३० वा.

प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १७९ वी बैठक **शुक्रवार, दि.१९ जुलै, २०२४ रोजी सकाळी ११:३० वा. राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृह येथे** मा. कुलगुरु महोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ.) प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | डॉ. राजीवकुमार शिवशंकर मेंते | सदस्य | उपस्थित |
| ७) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ९) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १०) | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| ११) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १२) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १३) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १५) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | अनुपस्थित |
| १६) | डॉ. नलिनी टेंभेकर, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई, व मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे नामनिर्देशित) | सदस्या | ऑनलाईन उपस्थित |
| १७) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण) तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| १८) | प्रा. (डॉ.) विकास भाऊराव घुटे, प्र. वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| १९) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २०) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

स्वागत:

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले. तसेच प्रा. (डॉ.) विकास भाऊराव घुटे, प्रभारी वित्त व लेखा अधिकारी यांची ही प्रत्यक्ष पहिलीच बैठक असल्याने त्यांचे मा. कुलगुरु महोदय यांचे हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

अनुपस्थिती:

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस डॉ. अजित माधव पाटणकर अनुपस्थित होते. त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[०१]</td><td>१. दि.१३ जून, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ.<br>२. दि.०९ जुलै, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७६ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ.<br>३. दि.११ जुलै, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७७ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ.<br>४. दि.१६ जुलै, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७८ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत कायम करण्याची बाब विचारार्थ.</td><td>सभा व निवडणूका विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>१. दि.१३ जून, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांतामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली आहे.<br>• पान क्र.२२ येथील विषय क्र.१५ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.<br>पूर्वीचा ठराव<br>डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर, अधिसभा सदस्य यांनी दि.२८/०२/२०२४ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत सादर केलेल्या ठराव क्र.१६ अधिसभेने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>दुरुस्त केलेला ठराव<br>डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर, अधिसभा सदस्य यांनी दि.२८/०२/२०२४ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत सादर केलेल्या ठराव क्र.१६ नुसार अधिसभेने केलेली शिफारस खालील दुरुस्तीसह स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>सदरची वाढ ही दि.२०/०७/२०२४ पासून विद्यापीठाच्या विविध कार्यालयीन कामासाठी येणाऱ्या / जाणाऱ्या शिक्षक, अधिकारी / कर्मचारी / विविध अधिकार मंडळांचे सदस्य यांना लागू राहील.<br><table><tr><th>पेट्रोल</th><th>डिझेल / सीएनजी / इलेक्ट्रिकल</th><th>विशेष भत्ता</th></tr><tr><td>रु.१३/</td><td>रु.१२/-</td><td>रु.४००/-</td></tr></table>तसेच उपरोक्त संदर्भात यापूर्वी झालेले सर्व ठराव दि.२०/०७/२०२४ पासून सर्वानुमते रद्द करण्यात यावेत असे ठरले.</td><td>वित्त व लेखा विभाग</td></tr>
</table>

• पान क्र.३३ येथील विषय क्र.२१(१) मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.

विद्यार्थी विकास विभाग

**पूर्वीचा ठराव**

सदर विषयासंदर्भात सखोल अभ्यास करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १. | डॉ. वसंत गुरुशांत कोरे<br>प्र. अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा | अध्यक्ष |
| २. | अध्यक्ष/समन्वयक, मराठी अभ्यासमंडळ | सदस्य |
| ३. | डॉ. आय. जे. तांबोळी<br>मराठी अभ्यासमंडळातील मा.कुलगुरु नियुक्त सदस्य | सदस्य |

सदर समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत सादर करण्यात यावा.

**दुरुस्त केलेला ठराव**

सदर विषयासंदर्भात सखोल अभ्यास करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली. सदर समितीने विद्यापीठ व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांनी मराठी विषयांतील साहित्य प्रकारांमध्ये प्रकाशित होणाऱ्या साहित्यास पुरस्कार देण्याच्या अनुषंगाने नियमावली तयार करावी.

सदर समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत सादर करण्यात यावा.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १. | डॉ. वसंत गुरुशांत कोरे<br>प्र. अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा | अध्यक्ष |
| २. | अध्यक्ष/समन्वयक, मराठी अभ्यासमंडळ | सदस्य |
| ३. | डॉ. आय. जे. तांबोळी<br>मराठी अभ्यासमंडळातील मा.कुलगुरु नियुक्त सदस्य | सदस्य |

• पान क्र.३५ येथील विषय क्र.२१(३) मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.

मुलांचे व मुलींचे वसतिगृह

**पूर्वीचा ठराव**

विद्यापीठ परिसरातील मुलांचे व मुलींचे वसतिगृहामध्ये नियमित मेस पुरवठादार नेमण्यासाठी लवकरात लवकर निविदा प्रक्रिया करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

तसेच वसतिगृहातील विद्यार्थी यांचे हित पाहता, नियमित मेस पुरवठादार यांची नेमणूक होईपर्यंत उपहारगृह पुरवठादार यांना पुरवठा आदेश देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

दुरुस्त केलेला ठराव

विद्यापीठ परिसरातील मुलांचे व मुलींचे वसतिगृहामध्ये नियमित मेस पुरवठादार नेमण्यासाठी लवकरात लवकर निविदा प्रक्रिया करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

तसेच वसतिगृहातील विद्यार्थी यांचे हित पाहता, नियमित मेस पुरवठादार यांची नेमणूक होईपर्यंत उपहारगृह पुरवठादार यांना पुरवठा आदेश देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. सदर पुरवठादार हे विद्यार्थ्यांना पुरवठा करणाऱ्या जेवणाचा दर्जा तपासणे व इतर सोयी सुविधांची पाहणी करणे यासाठी सर्वानुमते खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.

| अ.क्र. | समिती सदस्याचे नांव | पदनाम |
|---|---|---|
| १. | मा. प्र-कुलगुरु | अध्यक्ष |
| २. | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य |
| ३. | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य |
| ४. | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य |
| ५. | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य |
| ६. | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या |
| ७. | डॉ. केदारनाथ लक्ष्मण काळवणे | सदस्य सचिव |

२. दि.०९ जुलै, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७६ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते कायम करण्यात आला.
३. दि.११ जुलै, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७७ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते कायम करण्यात आला.
४. दि.१६ जुलै, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७८ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते कायम करण्यात आला.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ०२ ] | १. दि.२२ फेब्रुवारी, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६९ व्या (तातडीची) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विचारार्थ.<br>२. दि.०५ मार्च, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७० व्या (तातडीची) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विचारार्थ.<br>३. दि.२२ मार्च, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७१ व्या (तातडीची) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विचारार्थ.<br>४. दि.१९ एप्रिल, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७२ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | १. दि.२२ फेब्रुवारी, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६९ व्या (तातडीची) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाहीचा अहवालाची नोंद घेण्यात आली.<br>२. दि.०५ मार्च, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७० व्या (तातडीची) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाहीचा अहवालाची नोंद घेण्यात आली.<br>३. दि.२२ मार्च, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७१ व्या (तातडीची) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाहीचा अहवालाची नोंद घेण्यात आली.<br>४. दि.१९ एप्रिल, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७२ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाहीचा अहवालाची नोंद घेण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०३ ] | सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या बी.फॉर्मसी या पदवी अभ्यासक्रमामध्ये गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस सन २०२४ पासून, १ ऑगस्ट, विद्यापीठ वर्धापन दिनी प्रत्येक वर्षी **"कै. योगीराज शैलेश साखरे स्मृती पुरस्कार" या नावाने रोख पारितोषिक देणेसाठी डॉ. अंजली शैलेश साखरे यांनी विनंती करुन रु.१,००,०००/- चा धनादेश क्र.२५८७३३ वित्त व लेखाधिकारी यांच्या नावे विद्यापीठाकडे जमा केला आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३१ (ट) नुसार धनादेश स्विकारण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: डॉ. अंजली शैलेश साखरे यांचे कडून विद्यापीठास प्राप्त झालेल्या दि.२५/०६/२०२४ रोजीच्या पत्रानुसार त्यांनी अशी विनंती केली आहे की, विद्यापीठ सलग्नित सर्व बी. फॉर्मसी महाविद्यालयातील पदवी अभ्यासक्रमामध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस "कै. योगीराज शैलेश साखरे स्मृती पुरस्कार" या नावाने रोख पारितोषिक देणेसाठी विद्यापीठास वित्त व लेखाधिकारी यांचे नावे रु. १,००,०००/- चा बँक ऑफ इंडिया, सोलापूर धनादेश (क्र. २५८७३३) आणि चालू वर्ष २०२४ पासून १ ऑगस्ट विद्यापीठ वर्धापन दिनी पुरस्कार देणेसाठी रु.८,०००/- चा बँक ऑफ इंडिया, सोलापूर धनादेश (क्र. २५८७३४) विद्यापीठाकडे जमा केला आहे.<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३१ (ट) नुसार देणगी स्वीकारण्याचे अधिकार व्यवस्थापन परिषदेस आहेत.<br>उपरोक्त देणगी स्वरुपात देण्यात आलेला रु.१,००,०००/- चा धनादेश आणि आगामी काळात होणाऱ्या १ ऑगस्ट, विद्यापीठ वर्धापन दिनी पुरस्कार देणेसाठी रु. ८,०००/-चा धनादेश विद्यापीठाकडे जमा करण्यात आला आहे. सदरचे धनादेश वित्त व लेखा विभागाकडे जमा करुन नविन बजेट हेड "कै. योगीराज शैलेश साखरे स्मृती पुरस्कार" या नावाने राष्ट्रीयकृत बँकेत Fixed Deposit म्हणून ठेवण्याची पुढील कार्यवाही करण्यासाठी धनादेश जमा करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव सादर. | अभ्यासमंडळे विभाग |

सबब, सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या बी.फॉर्मसी या पदवी अभ्यासक्रमामध्ये गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस सन २०२४ पासून, १ ऑगस्ट, विद्यापीठ वर्धापन दिनी प्रत्येक वर्षी "कै. योगीराज शैलेश साखरे स्मृती पुरस्कार" या नावाने रोख पारितोषिक देणेसाठी डॉ. अंजली शैलेश साखरे यांनी विनंती करुन रु.१,००,०००/- चा धनादेश क्र.२५८७३३ वित्त व लेखा अधिकारी यांच्या नावे विद्यापीठाकडे जमा केला आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३१(ट) नुसार धनादेश स्विकारण्याची बाब विचारार्थ.

**ठराव:** **सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या बी.फॉर्मसी. या पदवी अभ्यासक्रमामध्ये गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस सन २०२४ पासून, १ ऑगस्ट या विद्यापीठ वर्धापन दिनी "कै. योगीराज शैलेश साखरे स्मृती पुरस्कार" या नावाने रोख पारितोषिक देणेसाठी डॉ. अंजली शैलेश साखरे यांनी विनंती करुन रु.१,००,०००/- चा धनादेश क्र.२५८७३३ वित्त व लेखाधिकारी यांच्या नावे विद्यापीठाकडे जमा केला असून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३१(ट) नुसार धनादेश स्विकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच सदर रोख पारितोषिक व विद्यापीठ वर्धापन दिनी गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारे इतर सर्व रोख पारितोषिके हे विद्यापीठ वर्धापन दिनाऐवजी दीक्षांत समारंभामध्ये देण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.**

**त्याचप्रमाणे विविध रोख रक्कमेच्या व गोल्ड मेडल पारितोषकांच्या अनुषंगाने सर्वंकष अभ्यास करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.**

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | अध्यक्ष |
| २) | वित्त व लेखा अधिकारी | सदस्य |
| ३) | संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | सदस्य |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ०४ ] | **Sector Skill Council of India व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (वाणिज्य व व्यवस्थापन संकुल) यांच्याबरोबर सामंजस्य करार करण्यास व कराराचा मसुदा विचारार्थ**<br>टिपणी: वाणिज्य व व्यवस्थापन संकुलामध्ये B.Com. (BFSI) हा अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी अधिष्ठाता मंडळ, विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषद यांची मान्यता मिळालेली आहे. Sector Skill Council of India व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर (वाणिज्य व व्यवस्थापन संकुल) यांच्याबरोबर शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून B.Com. (BFSI) अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत सामंजस्य करार करावयाचा आहे. या करारामुळे B.Com. (BFSI) या अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना व विद्यापीठाला खालील फायदे होऊ शकतात.<br>१. कौशल्य आधारित अभ्यासक्रम<br>२. प्रत्येक विद्यार्थ्याला ०१ वर्षाची Internship / Apprenticeship with Stipend<br>३. NEP-२०२० नुसार अभ्यासक्रम<br>४. अभ्यासक्रम यशस्वीरित्या पुर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांस त्यांच्या योग्यतेनुसरार Placement<br>५. Online किंवा Offline Training<br>६. विद्यार्थी व शिक्षकांना Skill Courses चे अध्ययन साहित्याची उपलब्धता<br>सदर सामंजस्य कराराचा मसुदा नवोपक्रम संशोधन व साहचर्य मंडळ या विभागाकडील MOU Committee कडून तपासून घेतला असून सदर करार करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३१ (झ) नुसार व्यवस्थापन परिषदेची मान्यता असणे आवश्यक आहे.<br>सबब, सदर सामंजस्य कराराचा मसुदा व कराराची बाब विचारार्थ. | वाणिज्य व व्यवस्थापन संकुल |
| ठराव: | **Sector Skill Council of India व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (वाणिज्य व व्यवस्थापन संकुल) यांच्यासोबत करावयाचा सामंजस्य कराराच्या मसुद्यामध्ये दुरुस्त्या करुन सदरचा विषय पुनश्च: सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ०५ ] | प्रस्तुत विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि Sevavardhini, Pune व राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि Dr. Hedgewar Raktapedhi, Solapur यांचेशी सामंजस्य करार (MoU) करण्यास व कराराचा मसुदा विचारार्थ.<br>टिपणी: Sevavardhini, Pune आणि Dr. Hedgewar Raktapedhi, Solapur यांचेकडून प्रस्तुत विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभागाशी MoU करण्यासाठी प्रस्ताव प्राप्त झाला आहे. प्राप्त झालेल्या दोन्ही संस्थेसमवेत MoU केल्यास विद्यापीठातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने वर्षभरात विविध सामाजिक कार्यक्रम / उपक्रम राबविता येणार आहे. त्याचा फायदा प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित रासेयो एकक असलेल्या महाविद्यालयांतील विद्यार्थी, महाविद्यालयीन दत्तक गावे, विद्यापीठ परिसरातील विद्यार्थी व कर्मचारी यांना होणार आहे.<br>सबब, उक्त वस्तुस्थिती विचारात घेता, दोन्ही संस्थेबरोबर सामंजस्य करार (MoU) करण्यास व कराराचा मसुदा विचारार्थ. | राष्ट्रीय सेवा योजना |
| ठराव: | प्रस्तुत विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि Sevavardhini, Pune व राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि Dr. Hedgewar Raktapedhi, Solapur यांचेशी सामंजस्य करार (MoU) करण्यास व कराराच्या मसुद्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>तथापि, विद्यापीठातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांना रक्ताची (Blood) आवश्यकता भासल्यास Dr. Hedgewar Raktapedhi, Solapur यांनी रक्त (Blood) तात्काळ उपलब्ध करुन द्यावे असे करारात नमूद करुन करार करावा असे सर्वानुमते ठरले. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०६ ] | जैन सिनियर सिटिझन्स ऑर्गनायझेशन (जैनस्को), सोलापूर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (भाषा व वाड्:मय संकुल-प्राकृत विभाग) यांच्यासोबत करावयाचा सामंजस्य कराराचा मसुदा व करार करण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: उपरोक्त विषयासंदर्भात भाषा व वाङ्मय संकुलातील प्राकृत विभाग व जैन सिनिय सिटिझन्स ऑर्गनायझेशन (जैनस्को), सोलापूर यांच्यासोबत सामंजस्य करार करावयाचा असल्याने सदर पत्रासोबत जोडलेला सामंजस्य करार करण्याचा मसूदा (MoU) सेल यांच्याकडून तपासून घेवून दि.२७/०५/२०२४ रोजीच्या (MoU) सेल मध्ये झालेल्या बैठकीच्या सुचनेनुसार सामंजस्य कराराचा मसुदा मान्य करण्यात आला आहे.<br>सबब, जैन सिनियर सिटिझन्स ऑर्गनायझेशन (जैनस्को), सोलापूर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (भाषा व वाड्:मय संकुल-प्राकृत विभाग) यांच्यासोबत करावयाचा सामंजस्य कराराचा मसुदा व करार करण्याची बाब विचारार्थ. | भाषा व वाड्:मय संकुल |
| ठराव: | जैन सिनियर सिटिझन्स ऑर्गनायझेशन (जैनस्को), सोलापूर व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (भाषा व वाड्:मय संकुल-प्राकृत विभाग) यांच्यासोबत करावयाच्या सामंजस्य कराराचा मसुदा व करार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>तथापि, करारातील समन्वयक यांची नावे ही विद्यापीठ व जैन सिनियर सिटिझन्स ऑर्गनायझेशन (जैनस्को), सोलापूर यांनी विचारविनिमय करुन ठरवावी असे सर्वानुमते ठरले. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०७ ] | Life Sciences Sector Skill Development Council (LSSSDC) व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (जैवविज्ञान संकुल) यांच्या समवेत सामंजस्य करार (MoU) करण्यास, तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठातील जैवविज्ञान संकुल अंतर्गत B.Sc. Pharmaceutical Manufacturing and Quality हा ३/४ वर्षाचे Apprenticeship Embedded Degree Program शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून सुरु करण्याचे प्रस्तावित आहे. त्यास अनुसरून Life Sciences Sector Skill Development Council (LSSSDC) यांच्या समवेत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर (जैवविज्ञान संकुल) यांच्यासोबत सामंजस्य करार (MoU) करण्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्यावतीने मा. कुलगुरु महोदय यांची दि.१७/०५/२०२४ रोजीच्या टिपणीन्वये मान्यता घेण्यात येऊन कार्यवाही करण्यात आलेली आहे.<br>सबब, Life Sciences Sector Skill Development Council (LSSSDC) व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (जैवविज्ञान संकुल) यांच्यासोबत करावयाचा सामंजस्य करार (MoU) करण्यास तातडीची बाब म्हणून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२(७) अन्वये मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव. | जैवविज्ञान संकुल |
| ठराव: | Life Sciences Sector Skill Development Council (LSSSDC) व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर (जैवविज्ञान संकुल) यांच्यासोबत करावयाचा सामंजस्य कराराच्या मसुद्यामध्ये दुरुस्त्या करुन सदरचा विषय पुनश्च: सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. | |

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ०८ ]</td><td>
विद्यापीठ अध्यादेश क्र.१५८ (२.१) अ.क्र. ii व vi मधील तरतुदीनुसार प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील मागासवर्गीय शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या कल्याणासाठी तीन वर्षे कालावधीकरीता "विशेष कक्ष स्थायी समिती" गठीत करुन सदस्यांचे नामनिर्देशनाची बाब विचारार्थ.
टिपणी: विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील मागासवर्गीय शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या कल्याणासाठी व त्यांना नियमानुसार असलेल्या विशेष सवलती योग्य प्रकारे उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने विद्यापीठात विशेष कक्ष स्थायी समितीचे गठण होणे आवश्यक आहे.
सदर समितीने गठण विद्यापीठ अध्यादेश क्र.१५८ (२.१) मधील तरतुदीनुसार तीन वर्षासाठी करावयाची असून, मागील दि.०१/०६/२०२१ ते ३१/०५/२०२४ या तीन वर्षाच्या कालावधीसाठी गठीत करण्यात आलेल्या समितीची मुदत दि.३१/०५/२०२४ रोजी संपत असल्याने, नव्याने दि.०१/०६/२०२४ ते ३१/०५/२०२७ या तीन वर्षासाठी विशेष कक्ष स्थायी समिती गठीत करावी लागणार आहे.
शिवाजी विद्यापीठ अध्यादेश क्र.१५८ (२.१) प्रमाणे समितीची रचना पुढीलप्रमाणे आहे.
<table>
<tr><td>i</td><td>The Vice-Chancellor</td><td>Ex-Office-Chairman</td></tr>
<tr><td>ii</td><td>2-3 Professors</td><td>Members</td></tr>
<tr><td>iii</td><td>3-5 Principals</td><td>Members</td></tr>
<tr><td>iv</td><td>1-2 Readers</td><td>Members</td></tr>
<tr><td>v</td><td>1-2 Lecturers</td><td>Members</td></tr>
<tr><td>vi</td><td>2 Women Representative from Teaching and Non-Teaching Category</td><td>Members</td></tr>
<tr><td>vii</td><td>A representative of the State Govt.</td><td>Members</td></tr>
<tr><td>viii</td><td>The Deputy Registrar (Spl.Cell)</td><td>Members-Secretary</td></tr>
</table>
The members at Serial No. ii to vi are to be nominated by the Management Council.
Tenure: The tenure of members at Sr.No. ii to vi shall be three years.
</td><td>विशेष कक्ष विभाग</td></tr>
</table>

उक्तप्रमाणे विशेष कक्ष स्थायी समिती गठीत करणेसाठी अनुक्रमे ii to vi मधील तरतुदीनुसार प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील मागासवर्गीय शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या कल्याणासाठी तीन वर्षे कालावधीकरीता "विशेष कक्ष स्थायी समिती" गठीत करुन सदस्यांचे नामनिर्देशनाची बाब विचारार्थ.

ठराव: विद्यापीठ अध्यादेश क्र.१५८ (२.१) अ.क्र. ii व vi मधील तरतुदीनुसार प्रस्तुत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील मागासवर्गीय शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांच्या कल्याणासाठी तीन वर्षे कालावधीकरीता "विशेष कक्ष स्थायी समिती" मध्ये सर्वानुमते खालीलप्रमाणे सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| ii | **2-3 Professors** | डॉ. आर. जे. खंदारे |
| | | डॉ. वसंत गुरुशांत कोरे |
| | | प्रा. (डॉ.) गौतम सुबण्णा कांबळे |
| iii | **3-5 Principals** | प्राचार्य डॉ. महेंद्र सुदाम कदम |
| | | प्राचार्य डॉ. सिकंदर मुलानी |
| | | प्राचार्य डॉ. अनंत बाळू शिंगाडे |
| | | प्राचार्य डॉ. सुनिल धोंडिबा हेळकर |
| | | प्राचार्य डॉ. चंद्रकांत जगन्नाथ खिलारे |
| iv | **1-2 Readers** | डॉ. आर. सी. शिंदे |
| | | डॉ. प्रभाकर नागनाथ कोळेकर |
| v | **1-2 Lecturers** | डॉ. विकास दादाभाऊ कडू |
| | | डॉ. आर. जी. खानापुरे |
| vi | **2 Women Representative from Teaching and Non-Teaching Category** | डॉ. श्रीमती सोनाली गायकवाड |
| | | श्रीमती ज्योती कुंडलिक कोकणे |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०९ ] | **प्रस्तुत विद्यापीठातील सर्व विद्याशाखांच्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिकांचे DTP-Type setting and secured remote paper delivery (SRPD) या परीक्षेच्या कामाकरीता गोपनीय फर्म निश्चित करण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी:<br>१) गोपनीय विभागाची दि.२१/०६/२०२४ रोजीची टिपणी.<br>२) दि.०४/०७/२०२४ रोजीच्या मा. कुलगुरुमहोदय यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीचा अहवाल.<br>३) Edulab Education Exchange Pvt. Ltd या फर्मला देण्यात आलेली दि.१५/०३/२०२४ रोजीची Work Order.<br>उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये परीक्षेतील DTP-Type setting and Secured Remote Paper Delivery (SRPD) हे काम कोणत्या फर्मला द्यावे यासंदर्भात आदेशार्थ टिपणी सादर केली असता. मा. कुलगुरु महोदय यांनी Edulab या फर्मकडे प्रश्नपत्रिकेचे DTP- Type Setting ची सुविधा आहे किंवा नाही हे तपासून घेवून नंतर प्र.कुलगुरु, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी व कुलसचिव यांच्याशी सविस्तर चर्चा करुन विद्यापीठ नियम पाळून पूढील कार्यवाही करणेबाबत सूचित करण्यात आले होते.<br>उपरोक्त मा. कुलगुरु महोदय यांच्या ओदशानुसार दि.०४/०७/२०२४ रोजी मा.कुलगुरु यांच्या समवेत प्र.कुलगुरु, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी व कुलसचिव यांनी चर्चा करुन संदर्भ क्र. २ अन्वये अहवाल सादर केला आहे. सदर अहवालामध्ये खालील बाबी नमूद केल्या आहेत.<br>१. DTP-Type setting and Secured Remote Paper Delivery करीता ई-टेंडर करण्यात यावे. सदरील ई-टेंडर मध्ये Typing with DTP तसेच DTP with Question Paper Delivery या दोन बाबीकरीता BOQ मध्ये स्वतंत्रपणे दर मागविण्यात यावेत व सदरचा विषय आगामी व्यवस्थापन परिषदेमध्ये ठेवण्यात यावा.<br>२. मा. कुलसचिव कार्यालयाकडून आध्यादेश क्र.३९ च्या अनुषंगाने एप्रिल, २०२२ दरम्यान शासनाकडून विद्यापीठाच्या झालेल्या चौकशी बाबतच्या सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती मागवून घ्याव्यात व त्यानुसार विद्यापीठ अध्यादेश क्र.३९, दि.०७/०९/२०१५ नुसार कार्यवाही करता येते किंवा कसे याबाबत मार्गदर्शन पत्राद्वारे मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांच्याकडून घेण्यात यावे.<br>३. वरील अनुक्रमांक २ अन्वये मार्गदर्शन प्राप्त होईपर्यंत सदरची DTP with Question Paper Delivery करिता ई-टेंडर प्रक्रिया व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानंतर करण्यात यावे. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |

४. DTP-Type setting and Secured Remote Paper Delivery ही प्रक्रिया अन्य विद्यापीठात अध्यादेशद्वारे गोपनीय पध्दतीने होते किंवा ई-टेंडरमार्फत होते अथवा इतर कोणत्या तऱ्हेने होते याबाबतची माहिती दूरध्वनीवरुन / ईमेलद्वारे घेण्यात यावी.

याबाबत कार्यालयीन निवेदन असे की, उपरोक्त अहवालामध्ये Edulab या फर्मकडे DTP-Type setting ची सुविधा आहे किंवा नाही याबाबत कोणताही उल्लेख आढळून येत नाही. तसेच DTP-Type setting and Secured Remote Paper Delivery यासाठी निविदा प्रक्रिया राबवून न्यूनतम दर सादर केलेले Weshine या गोपनीय फर्मला काम द्यावे किंवा सदर ई-टेंडर प्रक्रिया रद्द करावी याबद्दलही उल्लेख आढळून येत नाही.

उपरोक्त सदंर्भ क्र. ३ अन्वये मा. संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांच्याकडून प्राप्त वर्कऑर्डर मध्ये मुद्दा क्र. २ मध्ये Question paper Delivery व इतर कामकाजासंदर्भात खालील बाबी नमूद केले आहे.

Digital Question Bank, Paper Generation Module, Online Secured Delivery of Question Paper

उपरोक्त अहवालाप्रमाणे मुद्दा क्र.२ नुसार मा. कुलसचिव कार्यालयास दि.०६/०७/२०२४ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन टिपणीन्वये माहिती मागविण्यात आली आहे. सदर माहिती प्राप्त होताच शासनाकडून मार्गदर्शन मागविले जाईल. तसेच मुद्दा क्र. ४ नुसार या कार्यालयाचे पत्र क्र. पुअहोसोविसो/पवमूमं/१४४२, दि.०६/०७/२०२४ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्रातील इतर सर्व अकृषी विद्यापीठाकडे माहिती मागविण्यात येत आहे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठातील सर्व विद्याशाखांच्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिकांचे DTP-Type setting and Secured Remote Paper Delivery (SRPD) या परीक्षेच्या कामाकरीता गोपनीय फर्म निश्चित करण्यासाठी ई-निविदा प्रक्रिया राबविण्याची बाब विचारार्थ.

**ठराव:** **प्रस्तुत विद्यापीठातील सर्व विद्याशाखांच्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिकांचे केवळ DTP-Type setting या कामाकरीता गोपनीय फर्म निश्चित करण्यासाठी ई-निविदा प्रकिया राबविण्याऐवजी दरपत्रके (Quotation) मागवून प्रक्रिया राबविण्यास खालील अटींच्या अधिन राहून सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**१. सदरची संपूर्ण प्रक्रिया गोपनिय पध्दतीने परीक्षा व मूल्यमापन विभागाने राबवावी.**

**२. प्रक्रिया राबवून देयक आदायगीवेळी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी प्रमाणित केल्यावर केवळ वित्त व लेखा अधिकारी यांनी देयक अदा करावे.**

**३. यापूर्वी सन २०२३ मध्ये राबविण्यात आलेली ई-निविदा प्रक्रिया रद्द करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १० ] | कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्रोत केंद्र समितीच्या दि.१८/०५/२०२४ रोजी झालेल्या २७ व्या बैठकीचा कार्यवृत्तात मान्यतेस्तव.<br>टिपणी: ज्ञानस्रोत केंद्र समितीची दि.१८/०५/२०२४ रोजी बैठक संपन्न झाली. या बैठकीतील विषय पत्रिकेवर सन २०२४ ते २०२७ या तीन वर्षाकरिता पुस्तके व नियतकालिके खरेदी करण्यासाठी विक्रेत्यांकडून Trade -Terms form भरुन पुस्तके व नियतकालिके खरेदी करण्याची बाब, UGC कडून प्रादेशिक भाषेकरीता विना शुल्क उपलब्ध केलेले Drillbit Anti Plagiarism Software वापरात आणण्याची बाब, विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयातील संशोधक, विद्यार्थी, मार्गदर्शक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना ज्ञानस्रोत केंद्रातील पुस्तके घरी वापरासाठी देणेची बाब, ज्ञानस्रोत केंद्रात येणाऱ्या बहिस्त वाचकांसाठी ज्ञानस्रोत केंद्र वापरण्याकरिता शुल्क निर्धारित करणेची बाब, पीएच.डी. प्रबंध शोधगंगा या संकेतस्थळावर अपलोड करण्याकरिता प्रत्येक महिन्याची माहिती शैक्षणिक संशोधन व विकास विभागाकडून ज्ञानस्रोत केंद्राकडे पाठविण्याची बाब आणि डॉ. कोटणीस स्मारक येथील ऐतिहासिक पुस्तके देणगी स्वरुपात प्राप्त झाल्याची बाब इ. विषय विचारार्थ होते. तसेच दि.०५/०९/२०२३ रोजी झालेल्या ज्ञानस्रोत केंद्र समितीच्या २६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत आणि सन २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षाचा ज्ञानस्रोत केंद्राचा वार्षिक अहवाल इ. विषय माहितीस्तव होते. ज्ञानस्रोत केंद्र समितीच्या २७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ - ९६ (५) (घ) अन्वये मान्यतेस्तव सादर करणेचे आहे.<br>सबब, मान्यतेस्तव सादर. | कर्मवीर डॉ.मामासाहेब जगदाळे ज्ञानस्रोत केंद्र |
| ठराव: | कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे ज्ञानस्रोत केंद्र समितीच्या दि.१८/०५/२०२४ रोजी झालेल्या २७ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ११ ] | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ परिसरात १) छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्र २) स्वामी विवेकानंद युवा व्यक्तिमत्व विकास केंद्र ३) पंडित दीनदयाळ उपाध्याय अध्यासन केंद्र ४) स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर अध्यासन केंद्र ५) श्री मल्लीकार्जुन सिध्दरामेश्वर अध्यासन केंद्र ६) महर्षी दयानंद सरस्वती अध्यासन केंद्र ७) भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी अध्यासन केंद्र वरील एकूण ७ अध्यासन केंद्रे सुरु करण्याची विचारार्थ.<br>टिपणी: दि.२८ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत विषय क्र. १४ अन्वये, छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्र स्थापन करण्याबाबत ठराव पारित झाला आहे. तर विषय क्र.१८ अन्वये, स्वामी विवेकानंद युवा व्यक्तिमत्व विकास केंद्र सुरु करणेबाबत ठराव पारित झाला आहे. विषय क्र.२५ अन्वये, पंडित दीनदयाळ उपाध्याय अध्यासन केंद्र सुरु करण्यात यावे असा ठराव पारित झाला आहे, विषय क्र. २८ अन्वये, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर अध्यासन केंद्र सुरु करण्याबाबत ठराव पारित झाला आहे, विषय क्र.२९ अन्वये, श्री मल्लीकार्जुन सिध्दरामेश्वर अध्यासन केंद्र सुरु करण्याबाबत ठराव पारित झाला आहे, विषय क्र.३० अन्वये, महर्षी दयानंद सरस्वती अध्यासन केंद्र सुरु करण्याबाबत ठराव पारित झाला आहे, विषय क्र.३१ अन्वये, भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी अध्यासन केंद्र स्थापन करणेबाबत ठराव पारित झाला आहे. असे एकूण ६ अध्यासन केंद्रे व ०१ व्यक्तिमत्व विकास केंद्र सुरु करणेसंदर्भात अधिसभेने वरीलप्रमाणे ठराव पारित केले आहेत.<br>याबाबत सादर करण्यात येते की, महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई यांचे क्र. अध्यासन-२०२१/प्रक्र.विशि-२, दि.१८ सप्टेंबर, २०२३ अन्वये, सर्व अकृषी विद्यापीठांना अध्यासन केंद्रांसंदर्भात सूचना देण्याबाबत राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांच्या कुलसचिवांना कळविले आहे की, मा. लोकप्रतिनिधी तसेच विविध संघटना यांच्याकडून विद्यापीठांत अध्यासन केंद्र स्थापन करण्याकरिता निधी उपलब्ध करुन मान्यता देण्याचे प्रस्ताव प्राप्त होत आहेत. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, महाराष्ट्रातील विविध अकृषी विद्यापीठांमध्ये थोर व्यक्तींच्या नावे अध्यासन केंद्र निर्माण करण्या संदर्भात तयार करण्यात आलेल्या धोरणास दि.१६/०२/२०२२ रोजी मा. मंत्रीमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. | आस्थापना विभाग |

मा.मंत्री मंडळाने सुरु असलेली १३ अध्यासने व नवीन ५ अध्यासन केंद्रांना निधी देण्याचे तसेच या व्यतिरिक्त अध्यासन केंद्र सुरु करावयाचे असल्यास विद्यापीठ निधीतून सुरु करण्यास मान्यता देण्यात आली.

सदर मान्यतेच्या अनुषंगाने अध्यासन केंद्र स्थापन करण्याबाबत विहित करण्यात आलेल्या धोरणास संदर्भ क्र. १ येथील दि.०७/०६/२०२२ रोजीच्या शासननिर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच दि.२७/०६/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये नवीन ५ अध्यासन केंद्र स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. आता या व्यतिरिक्त अध्यासन केंद्र सुरु करावयाची असल्यास विद्यापीठ निधीतून सुरु करण्यात यावी असे या पत्राद्वारे कळविण्यात येत आहे.

सबब, उपरोक्त अधिसभेच्या विविध ठरावानुसार १) छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्र २) स्वामी विवेकानंद युवा व्यक्तिमत्व विकास केंद्र ३) पंडित दीनदयाळ उपाध्याय अध्यासन केंद्र ४) स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर अध्यासन केंद्र ५) श्री मल्लीकार्जुन सिध्दरामेश्वर अध्यासन केंद्र ६) महर्षी दयानंद सरस्वती अध्यासन केंद्र ७) भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी अध्यासन केंद्र अशी एकूण ७ अध्यासन केंद्रे सुरु करण्याची बाब विचारार्थ.

**ठराव:** **पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ परिसरात १) छत्रपती शिवाजी महाराज अध्यासन केंद्र २) स्वामी विवेकानंद युवा व्यक्तिमत्व विकास केंद्र ३) पंडित दीनदयाळ उपाध्याय अध्यासन केंद्र ४) स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर अध्यासन केंद्र ५) श्री मल्लीकार्जुन सिध्दरामेश्वर अध्यासन केंद्र ६) महर्षी दयानंद सरस्वती अध्यासन केंद्र ७) भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी अध्यासन केंद्र अशी ७ अध्यासन केंद्रे सुरु करण्यास तत्वत: मान्यता देण्यात आली.**

**तथापि, विद्यापीठ फंडातून याबाबत कोणतीही आर्थिक तरतूद करता येणे शक्य नसल्याने सदर अध्यासन केंद्रांसाठी सामाजिक संस्था किंवा चॅरिटेबल ट्रस्ट किंवा अन्य कोणाकडून निधी उपलब्ध होत असल्यास सुरु करण्यास हरकत नाही. त्यावेळी सदरचा विषय पुनश्च: व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करुन पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ १२ ]</td><td>
प्रस्तुत विद्यापीठाच्या वर्धापनदिनी निमित्त दि. ०१ ऑगस्ट, २०२४ रोजी प्रदान करण्यात येणाऱ्या विविध पुरस्काराकरीता गठीत करण्यात आलेल्या निवड समितीचा अहवालानुसार पुरस्कार वितरण करण्याची बाब विचारार्थ.
टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे २० वे वर्धापनदिन दि.०१/०८/२०२४ रोजी संपन्न होणार असून त्यादिनी विद्यापीठाकडून खालीलप्रमाणे विविध पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत.
१) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ जीवनगौरव पुरस्कार<br>
२) उत्कृष्ट शैक्षणिक संस्था पुरस्कार<br>
३) उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार<br>
४) उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार<br>
५) उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार (विद्यापीठ)<br>
६) उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार (महाविद्यालय)<br>
७) उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- वर्ग १ व २ (विद्यापीठ)<br>
८) उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- वर्ग ३ (विद्यापीठ)<br>
९) उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- वर्ग ४ (विद्यापीठ)<br>
१०)उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- अधिकारी व लिपिक संवर्गीय (महाविद्यालय)<br>
११) उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- चतुर्थश्रेणी (महाविद्यालय)
उक्त नमूद पुरस्कारापैकी जीवनगौरव पुरस्कार वगळता इतर १० पुरस्कारांकरीता सर्व संबंधितांकडून अर्ज मागविणेकामी दि.१४/०६/२०२४ व दि.०३/०७/२०२४ रोजीचे परिपत्रक निर्गमित करण्यात येऊन त्यानुसार अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि.०८/०७/२०२४ पर्यंत देण्यात आलेली होती. सदर परिपत्रकास अनुसरुन खालीलप्रमाणे अर्ज प्राप्त झालेले होते.
<table>
<tr><th>अ. क्र.</th><th>पुरस्काराचे नाव</th><th>प्राप्त अर्ज</th></tr>
<tr><td>१)</td><td>उत्कृष्ट शैक्षणिक संस्था पुरस्कार</td><td>०१</td></tr>
<tr><td>२)</td><td>उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार</td><td>०३</td></tr>
<tr><td>३)</td><td>उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार</td><td>०१</td></tr>
<tr><td>४)</td><td>उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार (विद्यापीठ)</td><td>०२</td></tr>
<tr><td>५)</td><td>उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार (महाविद्यालय)</td><td>०२</td></tr>
<tr><td>६)</td><td>उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- वर्ग १ व २ (विद्यापीठ)</td><td>०५</td></tr>
<tr><td>७)</td><td>उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- वर्ग ३ (विद्यापीठ)</td><td>०६</td></tr>
<tr><td>८)</td><td>उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- वर्ग ४ (विद्यापीठ)</td><td>०४</td></tr>
<tr><td>९)</td><td>उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- अधिकारी व लिपिक संवर्गीय (महाविद्यालय)</td><td>०४</td></tr>
<tr><td>१०)</td><td>उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार- चतुर्थश्रेणी (महाविद्यालय)</td><td>०१</td></tr>
</table>
उपरोक्तप्रमाणे नमूद १० पुरस्कारांकरीता विविध निवड समित्या गठीत करण्यात आलेल्या होत्या. सदर समितीने आदर्श नियमावलीतील नमूद तरतुदींचे अवलोकन करुन संबंधित पुरस्करांकरीता पुरस्कर्त्यांच्या नावांची शिफारशी सादर केलेले आहेत.
</td><td>आस्थापना विभाग</td></tr>
</table>

| | |
|---|---|
| | तसेच उक्त पुरस्कारांपैकी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ जीवनगौरव पुरस्काराकरीता मा. कुलगुरु महोदयांच्या अध्यक्षतेखाली सात सदस्यीय शोध समिती गठीत करण्यात आलेली होती. सदर समितीची बैठक दि.१०/०७/२०२४ रोजी विद्यापीठामध्ये संपन्न होऊन शोध समितीने सदर पुरस्काराकरीता पुरस्कर्त्याची निवड करुन त्यांचा अहवाल सादर केलेला आहे.<br>उक्त नमूद सर्व ११ पुरस्काराकरीता गठीत निवड/शोध समितीने गोपनीय पध्दतीने सादर केलेल्या अहवालास अनुसरुन सर्व संबंधित पुरस्कर्त्यांना विद्यापीठाच्या २० व्या वर्धापनदिनी म्हणजेच दि.०१/०८/२०२४ रोजी प्रदान करण्यात येणार आहेत.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठाच्या वर्धापनदिनी निमित्त दि. ०१ ऑगस्ट, २०२४ रोजी प्रदान करण्यात येणाऱ्या विविध पुरस्काराकरीता गठीत करण्यात आलेल्या निवड समितीचा अहवालानुसार पुरस्कार वितरण करण्याची बाब विचारार्थ. |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठाच्या वर्धापनदिनी निमित्त दि. ०१ ऑगस्ट, २०२४ रोजी प्रदान करण्यात येणाऱ्या खालील पुरस्काराकरीता गठीत करण्यात आलेल्या निवड समितीचा अहवालानुसार खालीलप्रमाणे पुरस्कार वितरण करण्यास व खालील दुरुस्तीसह सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** |

| | |
|---|---|
| पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ जीवनगौरव पुरस्कार | श्री. डी. राम रेड्डी |
| उत्कृष्ट शैक्षणिक संस्था पुरस्कार | सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळ, कमलापूर |
| उत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार | बाबुराव पाटील कला व विज्ञान महाविद्यालय, अनगर |
| उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार | प्राचार्य डॉ. सुर्यवंशी चंद्रकांत श्रीपती |
| उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार (विद्यापीठ) | प्रा. (डॉ.) कांबळे गौतम सुभाना<br>प्रा. (डॉ). लोखंडे बाळकृष्ण जगन्नाथ |
| उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार (महाविद्यालय) | डॉ. दंडे वीरभद्र चनबस<br>डॉ. श्रीमती रंगरेज आयेशा मोहम्मद सादिक |
| उत्कृष्ट शिक्षकेत्तर अधिकारी पुरस्कार - वर्ग १ व २ (विद्यापीठ) | श्री. पवार आनंदराव बहिरु |
| उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार - वर्ग ३ (विद्यापीठ) | श्रीमती हुंडेकरी रुपाली विजयकुमार |
| उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार - वर्ग ४ (विद्यापीठ) | श्री. सोनकांबळे नामदेव यशवंत |
| उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार - अधिकारी व लिपिक संवर्गीय (महाविद्यालय) | श्री. सातव कैलास भागवत |
| उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार - चतुर्थश्रेणी (महाविद्यालय) | श्री. जाधव अभिजीत बाळासाहेब |

१) उक्त पुरस्कारांपैकी जीवनगौरव पुरस्कार वगळता इतर पुरस्कारांबरोबर रोख रक्कम देण्याची बाब रद्द करण्यात आली.

२) उक्त पुरस्कारांपैकी खालील पुरस्काराच्या नावामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली.

| पूर्वीचे नाव | दुरुस्त केलेले नाव |
|---|---|
| उत्कृष्ट शिक्षकेत्तर कर्मचारी पुरस्कार - वर्ग १ व २ (विद्यापीठ) | उत्कृष्ट शिक्षकेत्तर अधिकारी पुरस्कार - वर्ग १ व २ (विद्यापीठ) |

अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१३] | **प्रस्तुत विद्यापीठास कार्यालयीन कामासाठी कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ (एकत्रित वेतन, कुशल, अर्धकुशल व अकुशल) घेण्याकरिता वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभाग यांच्या दरपत्रक समितीच्या शिफारसीनुसार प्रती कर्मचारी प्रती दिन रु.०१.०० या दराने ११ (अकरा) महिन्याच्या कालावधीकरिता मे. रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टिम्स, पुणे या खाजगी कंत्राटदारास पुरवठा आदेश देणेबाबत, करारनामा करणेबाबत व तद्अनुषंगिक कार्यवाही करणेबाबतची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभागानी दि.०४/०७/२०२४ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन टिपणीन्वये प्रस्तुत विद्यापीठास कार्यालयीन कामासाठी मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठीचा ई-निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. प्राप्त निविदापैकी न्युनतम दर असलेले फर्म मे. रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टिम्स, पुणे यांना निश्चित करण्यात आले आहे असे नमूद करुन सदरचा प्रस्तावास मा. कुलगुरु महोदय यांची दि.२५/०६/२०२४ रोजी मान्यता घेवून आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह पुढील कार्यवाही करिता आस्थापना विभागाकडे पाठविण्यात आला आहे. तसेच संबंधित फर्मने दि.१२/०७/२०२४ रोजीच्या ईमेलने दराबाबत स्विकृती कळविली आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठास कार्यालयीन कामासाठी कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ (एकत्रित वेतन, कुशल, अर्धकुशल व अकुशल) घेण्याकरिता वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभाग यांच्या दरपत्रक समितीच्या शिफारसीनुसार प्रती कर्मचारी प्रती दिन रु.०१.०० या दराने ११ (अकरा) महिन्याच्या कालावधीकरिता मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टिम्स, पुणे या खाजगी कंत्राटदारास पुरवठा आदेश देणेबाबत, करारनामा करणेबाबत व तद्अनुषंगिक कार्यवाही करण्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभाग यांच्या दरपत्रक समितीच्या शिफारसीनुसार प्रती कर्मचारी प्रती दिन रु. ०१.०० या दराने ११ (अकरा) महिन्याच्या कालावधीकरिता मे. रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टिम्स, पुणे या खासगी कंत्राटदाराकडून प्रस्तुत विद्यापीठास कार्यालयीन कामासाठी कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ (एकत्रित वेतन, कुशल, अर्धकुशल व अकुशल) घेण्याकरिता सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**तसेच मा.कुलगुरु महोदय यांनी गठीत केलेल्या तज्ञ समितीने खालीलप्रमाणे शिफारस केल्याप्रमाणे तक्त्यात नमूद केल्यानुसार अ.क्र.१ यांनी प्रतिसाद न दिल्यास अ.क्र.२, तद्नंतर अ.क्र.३ ते ५ याप्रमाणे कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ. क्र. | निविदाधारकांचे नाव | तज्ञ समितीने क्रमवारीबाबत केलेली शिफारस |
|---|---|---|
| १. | मे. रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टिम्स प्रा.लि. पुणे | एक |
| २. | मे. एम.डी.एस. फॅसिलिटिस, सोलापूर | दोन |
| ३. | मे. संगीता मल्टि सर्व्हिसेस, सोलापूर | तीन |
| ४. | मे. जाधव एंटरप्रायझेस, सोलापूर | चार |
| ५. | मे. जयशंकर असोसिएट्स, पुणे | पाच |

**तसेच सद्यस्थितीत प्रस्तुत विद्यापीठास कंत्राटी मनुष्यबळ पुरवठादार मे. सिंग कमांडो सिक्युरिटी फोर्स प्रा. लि., नागपूर यांच्याकडून घेण्यात येणारी सेवा समाप्त केल्यानंतर कंत्राटी मनुष्यबळाच्या सेवेमध्ये ०७ दिवसाचा खंड देण्यात यावा व मे. रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टिम्स, पुणे या फर्मकडून प्रथमत: सुरक्षा ठेव रक्कम भरुन घेऊन करारनामा करण्यात यावा व त्यानंतर त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच सद्यस्थितीत खासगी कंत्राटदाराकडून सेवा समाप्तीबाबतची तारीख व नविन पुरवठादार यांना देण्यात येणाऱ्या पुरवठा आदेशाचा कालावधी निश्चित करण्याचे अधिकार मा. कुलगुरु महोदय यांना देण्याचे सर्वानुमते ठरले.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१४] | प्रस्तुत विद्यापीठास कार्यालयीन कामासाठी कंत्राटी पध्दतीने सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक (कुशल व अर्धकुशल) घेण्याकरिता वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभाग यांच्या दरपत्रक समितीच्या शिफारसीनुसार प्रती कर्मचारी प्रती दिन रु.०१.०० या दराने ११ (अकरा) महिन्याच्या कालावधीकरिता मे. रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टिम्स, पुणे या खाजगी कंत्राटदारास पुरवठा आदेश देणेबाबत, करारनामा करणेबाबत व तद्अनुषंगिक कार्यवाही करणेबाबतची बाब विचारार्थ.<br>टिपणी: वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभागानी दि.०४/०७/२०२४ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन टिपणीन्वये प्रस्तुत विद्यापीठास सुरक्षेच्या कामासाठी सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक पुरवठा करण्यासाठीचा ई-निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. प्राप्त निविदापैकी न्युनतम दर असलेले फर्म मे. रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टिम्स, पुणे यांना निश्चित करण्यात आले आहे असे नमूद करुन सदरचा प्रस्तावास मा. कुलगुरु महोदय यांची दि.२५/०६/२०२४ रोजी मान्यता घेवून आवश्यक त्या सर्व कागदपत्रासह पुढील कार्यवाही करिता आस्थापना विभागाकडे पाठविण्यात आला आहे. तसेच संबंधित फर्मने दि.१२/०७/२०२४ रोजीच्या ईमेलने (पत्रान्वये) दराबाबत स्विकृती कळविली आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठास सुरक्षेच्या कामासाठी कंत्राटी पध्दतीने सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक (कुशल व अर्धकुशल) घेण्याकरिता वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभाग यांच्या दरपत्रक समितीच्या शिफारसीनुसार प्रती कर्मचारी प्रती दिन रु.०१.०० या दराने ११ (अकरा) महिन्याच्या कालावधीकरिता मे. रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टिम्स, पुणे या खाजगी कंत्राटदारास पुरवठा आदेश देणेबाबत, करारनामा करणेबाबत व तद्अनुषंगिक कार्यवाही करणेबाबतची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभाग यांच्या दरपत्रक समितीच्या शिफारसीनुसार प्रती कर्मचारी प्रती दिन रु. ०१.०० या दराने ११ (अकरा) महिन्याच्या कालावधीकरिता मे. रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टिम्स, पुणे या खाजगी कंत्राटदाराकडून प्रस्तुत विद्यापीठास सुरक्षेच्या कामासाठी कंत्राटी पध्दतीने सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक (कुशल व अर्धकुशल) घेण्याकरिता सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच मा. कुलगुरु महोदय यांनी गठीत केलेल्या तज्ञ समितीने खालीलप्रमाणे शिफारस केल्याप्रमाणे तक्त्यात नमूद केल्यानुसार अ.क्र.१ यांनी प्रतिसाद न दिल्यास अ.क्र.२, तद्नंतर अ.क्र.३ ते ५ याप्रमाणे कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

| अ. क्र. | निविदाधारकांचे नाव | तज्ञ समितीने क्रमवारीबाबत केलेली शिफारस |
|---|---|---|
| १. | मे. रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टिम्स प्रा.लि. पुणे | एक |
| २. | मे. हिंदूस्थान सिक्युरिटी ॲन्ड इंटेलिजन्स सर्व्हिसेस, अमरावती | दोन |
| ३. | मे. संगीता मल्टि सर्व्हिसेस, सोलापूर | तीन |
| ४. | मे. पृथ्वी ॲन्ड राज मल्टिसर्व्हिसेस, लातूर | चार |
| ५. | मे. बॉस सिक्युरिटी ॲन्ड सर्व्हिसेस, नाशिक | पाच |

तसेच सद्यस्थितीत प्रस्तुत विद्यापीठास कंत्राटी सुरक्षा रक्षक पुरवठादार मे. अभिजित इंटेलिजन्स सिक्युरिटी ॲन्ड लेबर सप्लायर, नागपूर यांच्याकडून घेण्यात येणारी सेवा समाप्त केल्यानंतर कंत्राटी कंत्राटी सुरक्षा रक्षकांच्या सेवेमध्ये ०७ दिवसाचा खंड देण्यात यावा व मे.रक्षक सिक्युरिटी सर्व्हिसेस ॲन्ड सिस्टिम्स, पुणे या फर्मकडून प्रथमत: सुरक्षा ठेव रक्कम भरुन घेऊन करारनामा करण्यात यावा व त्यानंतर त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा. तसेच सद्यस्थितीत खासगी कंत्राटदाराकडून घेण्यात येणाऱ्या कंत्राटी मनुष्यबळाची सेवा समाप्तीची तारीख व नविन पुरवठादार यांना देण्यात येणाऱ्या पुरवठा आदेशाचा कालावधी निश्चित करण्याचे सर्व अधिकार मा. कुलगुरु महोदय यांना देण्याचे सर्वानुमते ठरले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १५ ] | **प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA), Multi-disciplinary Education and Research Universities (Component-१) प्रस्ताव अंतर्गत विशेष कार्यकारी अधिकारी (OSD) म्हणून नेमण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA) अंतर्गत प्रस्तुत विद्यापीठाने सादर केलेला Multi-disciplinary Education and Research Universities (Component-१) प्रस्ताव मंजूर झालेला आहे.<br>सदर प्रस्तावा अंतर्गत New Constructions, Renovation/Up-gradation, Equipments आणि Soft Component नुसार विविध कामे करण्यात येणार आहे. सदरची कामे शासनाच्या निर्देशानुसार व्यवस्थितरीत्या योग्य व वेळेत (प्रस्ताव कालावधीत) पूर्ण करुन द्यावयाचे आहे. यासाठी पीएम-उषा कार्यालयाकरीता एक अनुभवी व्यक्तीची गरज आहे.<br>सबब, प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA), Multi-disciplinary Education and Research Universities (Component-१) प्रस्ताव अंतर्गत विशेष कार्यकारी अधिकारी (OSD) म्हणून नेमण्याची बाब विचारार्थ. | पी.एम. उषा विभाग |
| ठराव: | **प्रधानमंत्री उच्चतर शिक्षा अभियान (PM-USHA), Multi-disciplinary Education and Research Universities (Component-१) प्रस्ताव अंतर्गत विशेष कार्यकारी अधिकारी (OSD) म्हणून श्री. रघुनाथ वाघावकर यांची रु.४५,०००/- प्रती माह इतक्या एकत्रित मानधनावर ११ महिन्यांच्या कालावधीसाठी नेमणूक करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १६ ] | माहे जुलै -२०२४ मध्ये आयोजित पीएच.डी. प्रवेश पुर्व परीक्षा (पेट -९) ही परीक्षा ऑनलाईन वेब बेस्ड (Android phone, Computer or Laptop, Tab etc) पध्दतीने आयोजित करण्याबबातची परीक्षा व मूल्यमापन मंडळाने व विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.<br><br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाची जुलै २०२४ मध्ये होणारी पीएच.डी प्रवेश पुर्व परीक्षा विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार दिनांक ३०/०७/२०२४ व ३१/०७/२०२४ रोजी आयोजित करण्यात आलेली आहे.<br><br>परीक्षा विभागामार्फत पदव्युत्तर प्रवेश पुर्व परीक्षा ही ऑनलाईन वेब बेस्ड पध्दतीने आयोजित करण्यात आली होती व ती यशस्वीपणे पार पाडण्यात आली असून पदव्युत्तर प्रवेश पुर्व फेरपरीक्षा देखिल ऑनलाईन वेब बेस्ड पध्दतीने आयोजित करण्यात आली आहे.<br><br>पीएच.डी प्रवेश पुर्व परीक्षा ही प्रथम ऑनलाईन संगणकीय पध्दतीने घेण्याबाबत नियोजन करण्यात आलेले होते. पंरतू सदर परीक्षेकरीता अंदाजे ३००० व त्या पेक्षा अधिक विद्यार्थी परीक्षार्थी म्हणून बसणार असल्याने संगणकीय पध्दतीने परीक्षा घेण्याकरीता तीन ते चार पेक्षा जास्त परीक्षा केंद्र निश्चित केले तर विद्यार्थ्यांची गैरसोय होईल व तसेच सदर परीक्षेसाठी विद्यापीठ कार्यक्षेत्राबाहेरील किंवा परदेशामध्ये वास्तव्य असणारे विद्यार्थी अर्ज करतात त्यांची ही गैरसोय होवू नये, अशी या विभागाची धारणा आहे.<br><br>सबब, माहे जुलै -२०२४ मध्ये आयोजित पीएच.डी. प्रवेश पुर्व परीक्षा (पेट -९) ही ऑनलाईन वेब बेस्ड (Android phone, Computer or Laptop, Tab etc) पध्दतीने आयोजित करण्याची बाब दि.११/०७/२०२४ रोजीच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या विचारार्थ सादर केली असता सदर विषयाबाबत सर्वंकष चर्चा होवून खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे.<br><br>ठराव :<br>अ) माहे जुलै -२०२४ मध्ये आयोजित पीएच.डी प्रवेश पुर्व परीक्षा (पेट -९) ही परीक्षा ऑनलाईन वेब बेस्ड् (Android phone, Computer or Laptop, Tab etc) पध्दतीने आयोजित करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>पेट-९ परीक्षा एकापेक्षा अधिक विषयामध्ये देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एकाच दिवशी घेण्यात यावी असे ठरले. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |

ब) तसेच पेट-९ परीक्षेतील गैरप्रकार टाळण्याकरिता सर्व्हीस प्रोव्हायडर यांनी आवश्यक ती सर्व माहिती सर्व सन्माननीय सदस्यांना दिली. तसेच सभागृहाने गैरप्रकार टाळण्याकरिता विद्यार्थ्यांना आवश्यक त्या सूचना देण्याच्या अनुषंगाने SOP तयार करण्यासाठी खालील प्रमाणे समिती गठीत करण्यात आली.

१) डॉ. प्रशांत पवार- अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा- अध्यक्ष

२) डॉ.आर.एस. मेंते- सहयोगी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा- सदस्य

३) डॉ. शशिकांत तांबे- सहयोगी अधिष्ठाता, आंतरविद्याशाखा- सदस्य

४) डॉ. एस. डी. राऊत- संगणकशास्त्र संकुल- सदस्य

५) डॉ. म. स. रोकडे- उपकुलसचिव- सदस्य सचिव

६) सर्व्हिस प्रोव्हायडर प्रतिनिधी- सदस्य

क) सदरचा विषय आगामी विद्यापरिषदेच्या व व्यवस्थान परिषदेच्या बैठकीत ठेवण्याचे ठरले.

माहे जुलै -२०२४ मध्ये आयोजित पीएच.डी. प्रवेश पुर्व परीक्षा (पेट -९) ही परीक्षा ऑनलाईन वेब बेस्ड (Android phone, Computer or Laptop, Tab etc) पध्दतीने आयोजित करण्याबबातची परीक्षा व मूल्यमापन मंडळाची शिफारस दि.१२/०७/२०२४ रोजीच्या विद्यापरीषदेच्या बैठकीसमोर विचारार्थ सादर केली असता सदर बैठकीत खालील प्रमाणे ठराव पारित झाला आहे.

ठराव: माहे जुलै-२०२४ मध्ये आयोजित पीएच.डी. प्रवेश पुर्वपरीक्षा (पेट-९) ही परीक्षा ऑनलाईन वेब बेस्ड (Android phone, Computer or Laptop, Tab etc) पध्दतीने आयोजित करण्याबाबतची परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केलेल्या सर्व शिफारसी स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

सबब, माहे जुलै -२०२४ मध्ये आयोजित पीएच.डी. प्रवेश पुर्व परीक्षा (पेट -९) ही परीक्षा ऑनलाईन वेब बेस्ड (Android phone, Computer or Laptop, Tab etc) पध्दतीने आयोजित करण्याबबातची परीक्षा व मूल्यमापन मंडळ व विद्यापरिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.

ठराव: **माहे जुलै -२०२४ मध्ये आयोजित पीएच.डी. प्रवेश पुर्व परीक्षा (पेट -९) ही परीक्षा ऑनलाईन वेब बेस्ड (Android phone, Computer or Laptop, Tab etc) पध्दतीने आयोजित करण्याबाबत विद्यापरिषदेने दि.१२/०७/२०२४ रोजी झालेल्या ठराव क्र. ०५ अन्वये केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १७ ] | राजभवन मुंबई येथील कार्यक्रमासाठी आयोजित निवासी सराव शिबिरातील खर्च माहितीस्तव. | विद्यार्थी विकास विभाग |

टिपणी: दि.२० जून, २०२४ रोजी राजभवन, मुंबई येथे मा. राज्यपाल यांच्या उपस्थितीत सांस्कृतिक कार्यक्रम साजरा करण्याबाबत श्री. विकास कुलकर्णी Under Secretary यांनी दूरध्वनीद्वारे डॉ. केदारनाथ काळवणे यांना सुचित केले होते. राजभवन येथे झालेल्या चर्चेनुसार, पश्चीम बंगाल या राज्याचे दोन लोकनृत्य व लोकगीत व पश्चीमबंगाल या राज्याविषयीचा माहितीपट तयार करुन त्यांचे सादरीकरण करण्याबाबत सुचविण्यात आले होते. त्यासाठी दि.१० ते १९ जून, २०२४ या दरम्यान १० दिवसाच्या निवासी सराव शिबीराचे आयोजन करुन ३५ व्यक्तींचे दोन नृत्य व एक लोकगीत व माहितीपटाची तयारी चालू होती. परंतू श्री. विकास कुलकर्णी Under Secretary राजभवन, मुंबई यांनी डॉ. केदारानाथ काळवणे यांना दूरध्वनीव्दारे शिक्षक आमदार निवडणूकीची आदर्श आचारसहिंता लागली असल्याने, सदरचा कार्यक्रम रद्द करण्यात आला असून, झालेल्या खर्चाबाबत विषय व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर केला असता, खालीलप्रमाणे ठराव करण्यात अला आहे

| | |
|---|---|
| ठराव क्र.१३ | मा. राज्यपाल महोदय यांच्या उपस्थितीत राजभवन, मुंबई येथे होणारा सांस्कृतिक कार्यक्रम रद्द झाल्याने सदर कार्यक्रमाच्या तयारीच्या अनुषंगाने झालेल्या प्रत्यक्ष खर्चास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच सदर खर्चाचा तपशील व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकीत सादर करावा असे ठरले. |

तरी शिबिरासाठी प्रशिकाचे मानधन, भोजन खर्चासाठी खालीलप्रमाणे खर्च झालेला आहे

| अ क्र | खर्चाचा तपशिल | झालेला एकूण खर्च |
|---|---|---|
| १ | लोकनृत्य प्रशिक्षण मानधन | ९,००० |
| २ | लोकनृत्य प्रशिक्षण मानधन | ९,००० |
| ३ | लोकगीत प्रशिक्षण मानधन | ८,००० |
| ४ | प्रति विद्यार्थी दोन वेळचा चहा एक वेळ नाष्टा दोन वेळ जेवण साठी रु.२००/- प्रति विद्यार्थी प्रमाणे २००X३५ = ७०००/-प्रति दिन प्रमाणे ०४ दिवसाचे | २८,००० |
| | एकुण झालेला खर्च | ५४,००० |

सबब, झालेला खर्च अदा करण्यात आला असून झालेला सर्व खर्च हा व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.

**ठराव:** **राजभवन मुंबई येथील कार्यक्रमासाठी आयोजित निवासी सराव शिबिरासाठी झालेल्या खर्चाची नोंद घेण्यात आली.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १८ ] | श्री. रविंद्र महादेव कोरे यांचे समायोजन करण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठातील कर्मचारी श्री. शरद शंकर पवार यांची दि.०५/१२/२००८ मध्ये सरळसेवेने रेकॉर्ड किपर-नि-लिपिक या पदावर नियुक्ती करण्यात आली होती. तद्नंतर दि.०४/११/२००९ रोजी श्री. शरद शंकर पवार यांना रेकॉर्ड किपर-नि-लिपिक या पदावरुन बडतर्फ करण्यात आले. सदर बडतर्फी आदेशाविरुध्द श्री. पवार यांनी विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधीकरण, पुणे येथे अपील क्र.७/२०१० दाखल केले होते. सदर याचिकेला अनुसरुन विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधीकरण, पुणे यांनी श्री. शरद पवार यांच्या बाजूने निकाल दिलेला होता. सदर निकालाविरुध्द विद्यापीठाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे याचिका क्र.W.P.No.९६७७/२०१० दाखल केली होती, त्याचाही निकाल श्री. शरद पवार यांच्या बाजूने झालेला होता. तथापि, सदर न्यायालयाच्या आदेशास अनुसरुन विद्यापीठाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे LPA No.४९/२०११ याचिका दाखल केलेली होती.<br>दरम्यान प्रस्तुत विद्यापीठाच्या दि.०८/०३/२०१० रोजीच्या विविध पदांच्या सरळ सेवाभरतीच्या जाहिरीतीच्या अनुषंगाने श्री. रविंद्र महादेव कोरे यांची रेकॉर्ड किपर-नि-लिपिक या पदावर विद्यापीठ आदेश क्र.सोविसो/आस्था/२०११-१२ / ८६६६, दि.३१/१२/२०११ अन्वये मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील प्रलंबित याचिका क्र. LPA No.५४१०/२०११ च्या निकालाच्या अधिन राहून रेकॉर्ड किपर-नि-लिपिक या पदावर नियुक्ती करण्यात आली होती. श्री. कोरे हे दि.०५/०१/२०१२ रोजी रेकॉर्ड किपर-नि-लिपिक या पदावर रुजू झाले. तद्नंतर श्री. कोरे यांनी दि.३०/०९/२०१४ रोजी विद्यापीठाकडे रेकॉर्ड किपर-नि-लिपिक या पदाचा राजीनामा सादर केला. त्यास अनुसरुन विद्यापीठाने श्री. कोरे यांचा राजीनामा स्वीकारुन त्यांना रेकॉर्ड किपर-नि-लिपिक या पदावरुन दि.३०/०९/२०१४ रोजी कार्यमुक्त केले होते. तद्नंतर श्री. कोरे यांनी त्यांना पुन्हा सेवेत रुजू करुन घेण्याबाबत विद्यापीठास पत्र व्यवहार करुन मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे सदर कार्यमुक्तीच्या आदेशाविरुध्द विविध मुद्दयांचा उल्लेख करुन W.P.No. ६७१२/२०१५ याचिका दाखल केली. सदर याचिकेची सुनावणी होवून श्री. कोरे यांनी दाखल केलेली याचिका दि.२५/०४/२०१६ रोजी फेटाळण्यात येवून Dismiss करण्यात आली. सदर आदेशाविरुध्द श्री. कोरे यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दि.३०/०४/२०१६ रोजी पुर्नविचार याचिका RPW No.(St.) १३३०४/२०१६ दाखल केली होती. तद्नंतर महाराष्ट्र शासन, विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांचे दि.२८/०७/२०१७ रोजीचे श्री. कोरे यांना सोलापूर विद्यापीठ सेवेचा रेकॉर्ड किपर-नि-लिपिक या पदाचा राजीनामा मागे घेऊन पुन्हा विद्यापीठ सेवेत रुजू करुन घेण्याबाबतच्या बैठकीचा अहवाल सादर करणेबाबत पत्र दिले. त्यास अनुसरुन दि.१९/१२/२०१७ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विषय क्र.८ नुसार खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.<br>"व्यवस्थापन परिषद ठराव क्र.०८ (२) दि.१० ऑगस्ट, २०१७ रोजीचा श्री. रविंद्र महादेव कोरे यांनी रेकॉर्ड किपर-नि-लिपिक या पदावर रुजू करुन घेण्याबाबतच्या ठरावावर म.सा.वि. अधिनियम २०१६ कलम १२(६) अन्वये फेर विचार करुन श्री. रविंद्र महादेव कोरे यांना रेकॉर्ड किपर-नि-लिपिक या पदावर मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील याचिका क्र. LPA No.४९/२०११ व RPWST/१३३०४/२०१६ च्या अधिन राहून रेकॉर्ड किपर-नि-लिपिक या पदावर रुजू करुन घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली." | आस्थापना विभाग |

सदर ठरावास अनुसरुन श्री. कोरे यांना दि.१५/०१/२०१८ रोजी अटी व शर्तीच्या अधीन राहून सेवेत रुजू होण्याबाबत कळविण्यात आले. त्यास अनुसरुन श्री. कोरे हे दि.१६/०१/२०१८ रोजी रुजू झाले व त्यांनी दि.०३/०३/२०१८ रोजी हमीपत्र विद्यापीठास सादर केले.

श्री. कोरे यांनी दाखल केलेली RPST No.१३३०४/२०१६ याचिका दि.०२/१२/२०१९ रोजी निकाली (Dismissed as withdrawn) निघाल्याने श्री. कोरे यांना दि.१५/१२/२०२० रोजी देण्यात आलेले सेवामुक्तीचे आदेश रद्द करण्यात येवून कार्यालयीन आदेश क्र.पुअहोसोविसो / आस्था / २०२१ / १२१०, दि.०८/०२/२०२१ नुसार रुजू होण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन श्री. कोरे हे दि.०९/०२/२०२१ रोजी रुजू झाले होते.

श्री. कोरे यांची नियुक्ती मा. उच्च न्यायालय, मुबई यांनी LPA (St) No.५४१०/२०११ (LPA No.४९/२०११) मध्ये दिलेल्या अंतरिम आदेशाच्या अधीन राहून असल्याने त्यांना विद्यापीठाने सेवेत कायम केल्याचे आदेश दिलेले नाहीत.

तद्नंतर मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रलंबित LPA (St) No.५४१०/२०११ (LPA No.४९/२०११) या प्रकरणामधील Consent Minutes of Order च्या अनुषंगाने दि.१७/०३/२०२३ रोजी मा. उच्च न्यायालय, मुबई यांनी पारित केलेल्या आदेशान्वये श्री. शरद शंकर पवार यांना दि.२८/०३/२०२३ अन्वये रेकॉर्ड किपर-नि-लिपिक या पदावर नियुक्ती आदेश पारित करण्यात आले व श्री. शरद पवार हे दि.३१/०३/२०२३ रोजी सदर पदावर रुजू झाले आहेत.

तसेच मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये श्री. शरद पवार यांना रेकॉर्ड किपर-नि-लिपिक या पदावर रुजू करुन घेणे आवश्यक असल्याकारणाने श्री. रविंद्र महादेव कोरे यांना रेकॉर्ड किपर-नि-लिपिक या पदावरुन दि.२७/०३/२०२३ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये सेवामुक्त करण्यात आले.

श्री. कोरे यांचा थोडक्यात सेवा व सेवाखंडाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | सेवेत असलेला कालावधी | सेवेच्या बाहेरचा कालावधी |
|---|---|---|
| १) | दि.०५/०१/२०१२ ते दि.३०/०९/२०१४<br>(०२वर्ष ०८ महिने २५ दिवस) | दि.०१/१०/२०१४ ते १५/०१/२०१८<br>**(०३ वर्ष ०३ महिने १५ दिवस)** |
| २) | दि.१६/०१/२०१८ ते दि.१५/१२/२०२०<br>(२ वर्ष १० महिने २९ दिवस) | दि.१६/१२/२०२० ते<br>दि.०८/०२/२०२१<br>**(०१ महिने २४ दिवस)** |
| ३) | दि.०९/०२/२०२१ ते २७/०३/२०२३<br>सेवामुक्त<br>(०२ वर्ष ०१ महिना १८ दिवस) | सेवामुक्त |
| **एकूण सेवा -०७ वर्ष ०९ महिने ११ दिवस** | | |

श्री. कोरे यांना सेवामुक्त केल्यानंतर मा. विजय सि.देशमुख, आमदार, विधानसभा सदस्य यांनी दि.०३/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये मा.ना.श्री. चंद्रकांत (दादा) पाटील, मंत्री (उच्च व तंत्रशिक्षण), महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई यांना श्री.कोरे यांना नियमानुसार पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर येथे रिक्त पदी सामावून घेण्याबाबत विनंती केली. सदर पत्रास अनुसरुन मा.स.रा.उतेकर, कक्ष अधिकारी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी दि.१७/०४/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सदर प्रकरणाचा वस्तुनिष्ठ अहवाल, अनुषंगिक कागदपत्रासह तात्काळ सादर करण्याबाबत कळविले होते.

त्यास अनुसरुन या विद्यापीठाच्या पत्र क्र.पुअहोसोविसो/आस्था/ २०२३/३३५५, दि.२४/०५/२०२३ अन्वये वस्तुनिष्ठ अहवाल कळविण्यात आला व श्री. रविंद्र कोरे यांना खास बाब म्हणून कोणत्या पदावर समायोजन करावे याबाबत आदेश प्राप्त व्हावेत अथवा आकृतीबंधामध्ये एक कनिष्ठ लिपिक पद मजुंर होवून मिळावे व सदर आदेश प्राप्त होताच विद्यापीठ प्रशासन श्री. रविंद्र कोरे यांना तात्काळ सदर पदावर रुजू करुन घेता येईल असे कळविले. सदरील पत्रास अनुसरुन मा. अजित बाविस्कर, उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई यांनी दि.१४/०६/२०२३ रोजीच्या पत्रान्वये *"श्री. रविंद्र कोरे यांना नियुक्ती देण्याची बाब विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील आहे. याबाबत समकक्ष पदांची रिक्तता विचारात घेऊन तसेच विहीत कार्यपध्दती व नियमातील तरतुदींचा विचार करुन श्री. रविंद्र कोरे यांच्या समावेशनाबाबतच्या विनंतीच्या अनुषंगाने विद्यापीठ स्तरावर निर्णय घेण्यात यावा"* असे कळविले.

उपसचिव, महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.१४/०६/२०२३ रोजीच्या पत्रास अनुसरुन श्री. रविंद्र कोरे यांच्या समकक्ष पदावरील समावेशनाबाबत निर्णय घेणेकामी दि.२६/०६/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये विषय ठेवला असता खालील ठराव पारित करण्यात आला.

*"उपसचिव महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्र शिक्षण विभाग पत्र क्र.संकीर्ण २०२०/पं.क्र.२३९/२०/वि.शि.-१, दि.१४/०६/२०२३ च्या पत्रानुसार निर्णय घेण्यासाठी समिती गठीत करण्याबाबतचे सर्वाधिकार मा.कुलगुरु महोदय यांना देण्याचे सर्वानुमते ठरले."*

व्यवस्थापन परिषदेच्या या ठरावाच्या अनुषंगाने सदर शासनाच्या पत्रावर निर्णय घेणेकामी दि.१२/०७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये समिती गठीत करण्यात आली, ज्यामध्ये डॉ. उमेश काकडे, विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग यांना समिती अध्यक्ष म्हणून मा.कुलगुरु महोदयांनी नामनिर्देशन केले होते. तथापि, डॉ. काकडे यांनी दि.१३/०७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सदरची कार्यवाही ही विद्यापीठ स्तरावर करावयाची असल्यामुळे सदरची समिती ही विद्यापीठ स्तरावर नियुक्त करणे आवश्यक आहे, त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करावी, असे कळविले. सदर पत्रास अनुसरुन मा.कुलगुरु महोदयांनी प्रा.देवानंद चिलवंत, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य यांची अध्यक्षपदी, प्राचार्य, डॉ. भिमाशंकर भांजे, व्यवस्थापन परिषद सदस्य, यांची सदस्य पदी व प्रा.डॉ. लक्ष्मीकांत दामा, तत्कालिन अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा यांचे सदस्य सचिव पदी नामनिर्देशन केले होते. सदर समितीने दि.२०/०७/२०२३ रोजी अहवाल विद्यापीठास सादर केला असता सदर अहवाल दि.२४/०७/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये सादर करण्यात आला होता. त्यास अनुसरुन सदर बैठकीमध्ये खालील ठराव पारित करण्यात आला होता.

*"मा. उपसचिव, महाराष्ट्र राज्य, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांच्या दि.१४/०६/२०२३ रोजीच्या पत्रास अनुसरुन श्री. रविंद्र महादेव कोरे यांच्या नियमित पदावरील समायोजनेबाबत मा. व्यवस्थापन परिषदेच्या ठरावाच्या अनुषंगाने मा.कुलगुरु महोदयांनी गठीत केलेल्या समितीने दि.२०/०७/२०२३ रोजी सादर केलेल्या अहवालातील शिफारशीनुसार शासनाच्या मान्यतेच्या अधिन राहून शासनाकडे अहवालाच्या अनुषंगाने समायोजनाचा प्रस्ताव पाठवून देण्यात यावा असे सर्वानुमते ठरले."*

सदर ठरावान्वये विद्यापीठाकडून श्री. रविंद्र महादेव कोरे यांना विद्यापीठाच्या सेवेत सामावून घेण्याबाबत दि.०२/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनास कळविले. सदर पत्रास अनुसरुन मा.सं. रा. उतेकर, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण

| | |
|---|---|
| | विभाग, मुंबई यांनी दि.११/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये "श्री. रविंद्र महादेव कोरे यांना सेवेत सामावून घेण्यासाठी कनिष्ठ लिपिकाचे पद रिक्त आहे, तसेच त्यांना सेवेत सामावून घेणे नियमास धरुन असल्याचा निष्कर्ष विद्यापीठाच्या स्तरावर गठित करण्यात आलेल्या समितीने काढला आहे. त्या अनुषंगाने व्यवस्थापन परिषदेने पारित केलेला ठराव विचारात घेऊन विषयाधीन प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. तथापि, सदर प्रस्तावास अधिनियमातील कोणत्या तरतुदीनुसार अथवा शासन आदेशानुसार मान्यता आवश्यक आहे, याबद्दल प्रस्तावामध्ये नमूद करण्यात आले नाही. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चे कलम ५(१२) मधील तरतुदीनुसार विद्यापीठ हे त्यांच्या कर्मचाऱ्यासाठी नियुक्ती प्राधिकारी आहे. व श्री. रविंद्र महादेव कोरे यांच्या संदर्भात विद्यापीठ हेच नियुक्ती प्राधिकारी आहे. यास्तव, श्री. कोरे यांच्या प्रकरणी विद्यापीठाने त्यांच्या स्तरावर, तपासून, यथोचित निर्णय घ्यावा," असे कळविले आहे.<br>तद्नंतर श्री. कोरे यांचे समायोजन करणेबाबत व त्यांना एकत्रित वेतन लागू करणेबाबतची बाब दि.१५/०९/२०२३ रोजीच्या बैठकीत प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत, राज्यपाल नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य यांनी विषय सादर केला असता त्यावर खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.<br>*"व्यवस्थापन परिषदेच्या दि.०१ मार्च, २०२३ रोजीच्या १५३ व्या बैठकीत श्री. रविंद्र कोरे यांच्याबाबत जो ठराव करण्यात आला होता त्या अनुषंगाने असे ठरले की, त्यांना कंत्राटी लेखनिक म्हणून रु.२५०००/-(अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त) इतके एकत्रित वेतन देण्यात यावे व दि.०६ जून, २०१७ रोजीच्या शासन अधिसूचनेतील तरतुदींबाबत आकृतीबंधाच्या अनुषंगाने शासन स्तरावर मार्गदर्शन मागावे असे सर्वानुमते ठरले."*<br>त्यानुसार श्री. कोरे यांना माहे १७ ऑगस्ट, २०२३ पासून कंत्राटी लेखनिक या पदावर रु.२५०००/- प्रतिमाह इतक्या एकत्रित वेतनावर घेण्यात आलेले आहे.<br>तसेच सदर ठरावातील दि.०६ जून, २०१७ रोजीच्या शासन अधिसूचनेतील तरतुदींबाबत शासनाकडून दि.२८/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये मार्गदर्शन मागविले असता सदर पत्रात नमूद प्रमाणे "वित्त विभाग, शासन निर्णय दि.१४/०१/२०१६ अन्वये लिपिक संवर्गात गट ड मधील कर्मचाऱ्यांमधून पदोन्नतीने भरावयांच्या पदांची मर्यादा संवर्ग संख्येच्या २५ टक्के वरुन ५० टक्केपर्यंत वाढविण्यात आली आहे. सदर शासन निर्णयामधील तरतूदी सर्व अकृषी विद्यापीठांना लागू आहेत. त्यानुषंगाने सदर शासन निर्णयानुसार पदोन्नती देण्याची कार्यवाही संबंधित पदाच्या सुधारित केलेल्या सेवाप्रवेश नियमानुसार करणे आवश्यक आहे, असे संदर्भीय शासन पत्र दि.१५/०९/२०२१ अन्वये सर्व अकृषी विद्यापीठांना कळविण्यात आले आहे. त्यानुसार आवश्यक कार्यवाही करावी," असे कळविले आहे.<br>सबब, या अनुषंगाने, श्री. रविंद्र महादेव कोरे यांच्या समायोजनाबाबत पुढे काय कार्यवाही करावी? यासाठी मार्गदर्शनार्थ बाब सादर. |
| ठराव: | **श्री. रविंद्र महादेव कोरे यांचे समायोजन करण्याबाबत योगिनी घारे, कुलसचिव व प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत, मा.कुलपती नियुक्त व्यवस्थापन परिषद सदस्य यांनी मा. विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर विभाग, सोलापूर यांचेकडे सदरबाबत चर्चा करुन त्यांचे मार्गदर्शन घ्यावे असे सर्वानुमते ठरले आणि तद्नंतर शासनाकडे तसा प्रस्ताव पाठविणेबाबत निर्णय घेणेसाठी पुढील येणाऱ्या व्यवस्थापन परिषदेसमोर सदर विषय ठेवण्यात यावा.** |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १९ ] | **दि.१३ जुन, २०२४ रोजीच्या मा.व्यवस्थापन परिषदेने SHPC या गोपनीय फर्मच्या देयकासंदर्भात सत्यता पडताळणी करण्यासाठी गठीत केलेल्या त्रिसदस्यीय समितीचा** अहवाल विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |

टिपणी: व्यवस्थापन परिषदेच्या दि.०५ मार्च, २०२४ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.८ च्या अनषंगाने शै.वर्ष २०२४-२४ मधील मार्च/एप्रिल २०२४ च्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिकांचे डी.टी.पी., टाईपसेटींग, प्रुफ रिडींग करुन वेळापत्रकानुसार प्रश्नपत्रिका ऑनलाईन ई-मोड (SRQPD) प्रणालिद्वारे गोपनीय पध्दतीने परीक्षाकेंद्रावर पाठविण्याच्या कामासाठी SHPC Technologies Pvt. Ltd, Mumbai या गोपनीय फर्मकडून करुन घेण्याकरिता वर्क ऑर्डर देण्यात आल्याची बाब दि.१३ जुन, २०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर केली असता खलीलप्रमाणे ठराव पारित झाला आहे.

ठराव: व्यवस्थापन परिषदेच्या दि.०५ मार्च, २०२४ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र.८ च्या अनषंगाने शै.वर्ष २०२४-२४ मधील मार्च/एप्रिल २०२४ च्या परीक्षांच्या प्रश्नपत्रिकांचे डी.टी.पी., टाईपसेटींग, प्रुफ रिडींग करुन वेळापत्रकानुसार प्रश्नपत्रिका ऑनलाईन ई-मोड (SRQPD) प्रणालिद्वारे गोपनीय पध्दतीने परीक्षा केंद्रावर पाठविण्याच्या कामासाठी SHPC Technologies Pvt. Ltd, Mumbai या गोपनीय फर्मकडून करुन घेण्याकरिता वर्क ऑर्डर देण्यात आल्याची सर्वानुमते नोंद घेण्यात आली.

तसेच सदर फर्मच्या देयकासंदर्भात सत्यता पडताळणी करण्यासाठी खालीलप्रमाणे त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात येऊन समितीच्या अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी असे ही सर्वानुमते ठरले.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | डॉ.समाधान दिगंबर पवार | अध्यक्ष |
| २. | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य |
| ३. | डॉ.श्रीकांत गणपतराव अंधारे<br>संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | सचिव |

त्यानुसार गठीत समितीने देयक सत्यता पडताळणी करुन खालीलप्रमाणे शिफारस केली आहे.

"SHPC या गोपनीय फर्म ने १७८५ प्रश्नपत्रिकांच्या ४५१७ पेजेसचे टाईपसेटींग केले असल्याने त्यांना वर्क ऑर्डरप्रमाणे प्रत्येक पेज रुपये ११० प्रमाणे देयक देणे असताना त्यांना रुपये १५० प्रमाणे देयक दिले गेले आहे. तेव्हा त्या फर्मला प्रत्येक पेज ४० रुपये जादा दिले गेले असल्याने सदर फरकाची रक्कम GST १८% सह त्या फर्मकडून मार्च-२०२४ च्या परीक्षा कामाच्या देयकामूधन ४५१७ पेजेस X ४० + (१८% GST रुपये ३२,५२२) = २,१३,२०२/- (एकूण - दोन लाख तेरा हजार दोनशे दोन रुपये) वसूल करावेत, अशी शिफारस ही समिती करीत आहे."

सबब, दि.१३ जुन, २०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेने SHPC या गोपनीय फर्मच्या देयकासंदर्भात सत्यता पडताळणी करण्यासाठी गठीत केलेल्या त्रिसदस्यीय समितीचा अहवाल विचारार्थ.

ठराव: **दि.१३ जुन, २०२४ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत SHPC या गोपनीय फर्मच्या देयकासंदर्भात सत्यता पडताळणी करण्यासाठी गठीत केलेल्या त्रिसदस्यीय समितीचा अहवाल खालील अटींच्या अधिन राहून सर्वानुमते स्विकारण्यात आला.**

**१. SHPC या गोपनीय फर्मच्या मार्च/एप्रिल, २०२४ च्या परीक्षांच्या देयकामधून रु.२,१३,२००/- इतकी रक्कम वजा करुन उर्वरित रक्कम अदा करण्यात यावी.**

**२. सदर प्रकरणांबाबत जबाबदारी निश्चित करण्यासाठी समितीने पुनश्च: बैठक घेऊन अहवाल सादर करावा असे सर्वानुमते ठरले.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ २० ] | सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित विद्यापीठ संकुलातील एम. ए. भाग २ (मराठी) अभ्यासक्रमामध्ये गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस सन २०२४ पासून, १ ऑगस्ट, विद्यापीठ वर्धापन दिनी प्रत्येक वर्षी "ह. भ. प. रघुनाथ गोविंद फुलसागर (हिरजकर) स्मृती पुरस्कार" या नावाने रोख पारितोषिक देणेसाठी प्रा.सौ. शुद्धमती सावता फुलसागर यांनी विनंती करून रु.१,००,०००/- चा धनादेश क्र. १५३६८१ हा वित्त व लेखाधिकारी यांच्या नावे विद्यापीठाकडे जमा केला आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३१ (ट) नुसार धनादेश स्विकारण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: प्रा. सौ. शुद्धमती सावता फुलसागर यांचे कडून विद्यापीठास प्राप्त झालेल्या दि.११/०७/२०२४ रोजीच्या पत्रानुसार त्यांनी अशी विनंती केली आहे की, विद्यापीठ संकुलातील एम. ए. भाग २ (मराठी) विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस "ह. भ. प. रघुनाथ गोविंद फुलसागर (हिरजकर) स्मृती पुरस्कार" या नावाने रोख पारितोषिक देणेसाठी विद्यापीठास वित्त व लेखाधिकारी यांचे नावे रु.१,००,०००/- चा बँक ऑफ महाराष्ट्र, उसमानाबाद या शाखेचा धनादेश (क्र.१५३६८१) आणि चालू वर्ष २०२४ पासून १ ऑगस्ट विद्यापीठ वर्धापन दिनी पुरस्कार देणेसाठी रु.८,०००/- चा बँक ऑफ महाराष्ट्र, उसमानाबाद धनादेश (क्र. १५३६८२) विद्यापीठाकडे जमा केला आहे.<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३१ (ट) नुसार देणगी स्वीकारण्याचे अधिकार व्यावस्थापन परिषदेस आहेत.<br>उपरोक्त देणगी स्वरुपात देण्यात आलेला रु.१,००,०००/- चा धनादेश आणि आगामी काळात होणाऱ्या १ ऑगस्ट, विद्यापीठ वर्धापन दिनी पुरस्कार देणेसाठी रु.८,०००/-चा धनादेश विद्यापीठाकडे जमा करण्यात आला आहे. सदरचे धनादेश वित्त व लेखा विभागाकडे जमा करून नविन बजेट हेड "ह. भ. प. रघुनाथ गोविंद फुलसागर (हिरजकर) स्मृती पुरस्कार" या नावाने राष्ट्रीयकृत बँकेत Fixed Deposit म्हणून ठेवण्याची पुढील कार्यवाही करण्यासाठी धनादेश वित्त व लेखा विभागाकडे जमा करण्याची बाब मान्यतेस्तव सादर. | अभ्यासमंडळे विभाग |

| | |
|---|---|
| | सबब, सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित विद्यापीठ संकुलातील एम. ए. भाग २ (मराठी) अभ्यासक्रमामध्ये गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस सन २०२४ पासून, १ ऑगस्ट, विद्यापीठ वर्धापन दिनी प्रत्येक वर्षी "ह. भ. प. रघुनाथ गोविंद फुलसागर (हिरजकर) स्मृती पुरस्कार" या नावाने रोख पारितोषिक देणेसाठी प्रा. सौ. शुद्धमती सावता फुलसागर यांनी विनंती करून रु.१,००,०००/- चा धनादेश क्र. १५३६८१ वित्त व लेखाधिकारी यांच्या नावे विद्यापीठाकडे जमा केला आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३१ (ट) नुसार धनादेश स्विकारण्याची बाब विचारार्थ. |
| ठराव: | **सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित विद्यापीठ संकुलातील एम. ए. भाग २ (मराठी) अभ्यासक्रमामध्ये गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस सन २०२४ पासून, १ ऑगस्ट या विद्यापीठ वर्धापन दिनी प्रत्येक वर्षी "ह. भ. प. रघुनाथ गोविंद फुलसागर (हिरजकर) स्मृती पुरस्कार" या नावाने रोख पारितोषिक देणेसाठी प्रा.सौ. शुद्धमती सावता फुलसागर यांनी विनंती करुन रु.१,००,०००/- चा धनादेश क्र. १५३६८१ वित्त व लेखाधिकारी यांच्या नावे विद्यापीठाकडे जमा केला असून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ३१ (ट) नुसार धनादेश स्विकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच सदर रोख पारितोषिक व विद्यापीठ वर्धापन दिनी गुणानुक्रमे प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांना देण्यात येणारे इतर सर्व रोख पारितोषिके हे विद्यापीठ वर्धापन दिनाऐवजी दीक्षांत समारंभामध्ये देण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.**<br>**त्याचप्रमाणे विविध रोख रक्कमेच्या व गोल्ड मेडल पारितोषकांच्या अनुषंगाने सर्वंकष अभ्यास करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.** |

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | अध्यक्ष |
| २) | वित्त व लेखा अधिकारी | सदस्य |
| ३) | संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | सदस्य |

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [२१(१)] | **भाभा अणुसंशोधन केंद्र, (BARC) मुंबई व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या मधील आकृती केंद्र प्रस्थापित करण्यासाठी सामंजस्य कराराचा मसुदा व करार करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: BARC ही भारत सरकारच्या अणुऊर्जा विभागाअंतर्गत एक बहुविद्याशाखीय R & D संस्था आहे, जी अणुऊर्जा निर्मिती, विज्ञानाची प्रगती, उद्योग आरोग्य आणि कृषी, संशोधन यासाठी ज्ञान आणि तंत्र निर्माण करण्याच्या उद्देशाने संशोधनात गुंतलेली आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या सीमावर्ती भागात DAE सामाजिक उपक्रमाच्या चौकटीत, BARC मधील वैद्यकीय, अन्न संरक्षण, कचरा व्यवस्थापन व इतर औद्योगिक आणि ग्रामीण अनुप्रयोगामध्ये नॉन-पॉवर ॲप्लिकेशन्स (NPAs) आणि स्पिन-ऑफ तंत्रज्ञान च्या विकासावर आधारित, एक संरचित कार्यक्रम तयार करण्यात आला आहे. AKRUTI ने BARC तंत्रज्ञानाची उपयुक्ता आणि ग्रामिण क्षेत्रात टेक्नोप्रिन्युअरशिपला वाव असल्याचे दाखवून दिले आहे. AKRUTI केंद्र इच्छुक टेक्नोप्रिन्युअर्सना शैक्षणि संस्थाद्वारे चालवल्या जाणाऱ्या सुविधेमध्ये BARC तंत्रज्ञानाचा प्रथम अनुभव घेण्यासाठी प्रोत्साहित केली आहे. सदर कराराचा मसुदा MoU Committee यांच्या दि.०१/०७/२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये सादर करण्यात आला होता. तरी त्यास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३१(झ) नुसार व्यवस्थापन परिषदेची मान्यता असणे आवश्यक आहे.<br>सबब, भाभा अणुसंशोधन केंद्र, (BARC) मुंबई व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या मधील आकृती केंद्र प्रस्थापित करण्यासाठी सामंजस्य कराराचा मसुदा व करार करण्याची बाब विचारार्थ. | रसायनशास्त्र संकुल |
| ठराव: | **भाभा अणुसंशोधन केंद्र, (BARC) मुंबई व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्या मधील आकृती केंद्र प्रस्थापित करण्यासाठी सामंजस्य कराराचा मसुदा व करार करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [२१(२)] | **School of Data Science and Business Intelligence (SDBI), Mumbai व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर यांच्याबरोबर सामंजस्य करार करण्याची बाब विचारार्थ**<br>टिपणी: संगणकशास्त्र संकुलामध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासुन B.Sc. Data Science, M.Sc. Data Science, B.Sc. Cyber Security, M.Sc. Cyber Security यासारखे अभ्यासक्रम सुरु करावयाचे आहे. त्यासाठी अधिष्ठाता मंडळ विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषद यांची मान्यता घेतलेली आहे. हे अभ्यासक्रम प्रस्तुत विद्यापीठ व School of Data Science and Business Intelligence (SDBI), Mumbai. यांच्या संयुक्त विद्यमाने सुरु करावयाचे आहे. त्या अनुषंगाने SDBI कडून प्राप्त झालेला सामंजस्य कराराचा मसुदा विद्यापीठाच्या MoU Cell कडे तपासण्यासाठी पाठविण्यात आले आहे. त्यासाठी MoU Cell ची दि.१६/०७/२०२४ रोजी बैठक झाली. त्यांनी सुचविलेल्या दुरुस्त्या व त्रुटी SDBI यांना ई-मेल द्वारे कळविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने SDBI कडून अद्याप उत्तर मिळालेले नाही. त्यामुळे MoU Cell कडून सामजंस्य कराराच्या अंतिम मसुदा मिळालेला नाही.<br>ह्या अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचे ज्ञान मिळेल व या विद्यार्थ्यांना IT क्षेत्रात नोकरीच्या संधी उपलब्ध होतील.<br>सदर सामंजस्य करारमध्ये MOU Cell ने सुचविलेल्या दुरुस्त्या झाल्यानंतर SDBI बरोबर सामजंस्य करार करुन घेण्यासाठी व्यवस्थापन परिषदेची मान्यता असणे आवश्यक आहे.<br>सबब, सदर सामंजस्य कराराचा मसुदा व कराराची बाब विचारार्थ. | संगणकशास्त्र संकुल |
| ठराव: | **सदरचा सामंजस्य करार हा MoU Cell कडून तपासून घेऊन तद्नंतर पुनश्च: सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [२१(३)] | प्रस्तुत विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ मधील Uddyam-PAHSUI Foundation Section 8 Company अल्पमुदतीचा अभ्यासक्रम सुरु करण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: राष्ट्रीय शैक्षणिक धोरध (NEP) २०२० च्या अनुषंगाने जे उच्च शिक्षणामध्ये लवचिकता आणि विद्यार्थी केंद्रीत शिक्षणावर भर देण्यासाठी नवीन युगातील अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमाचा पोर्टफोलिओ ऑफर करतात व तसेच हे अभ्यासक्रम नोकरीच्या बाजारपेठेतील विकसीत गरजा पूर्ण करण्यासाठी आणि वेगाने बदलणाऱ्या जगात उत्कृष्ठ कामगिरी करण्यासाठी आवश्यक कौशल्यासह विद्यार्थ्यांना सुसज्य करण्यासाठी डिझाइन केलेले आहेत.<br>तसेच विद्यार्थ्यांना केवल विशिष्ठ तांत्रिक ज्ञान मिळू शकले नाही, तर आजच्या आंतरविद्याशाखीय आणि परस्परसंबंधीत जगात महत्वाच्या असलेल्या विस्तृत श्रेणीची क्षमता देखील विकसीत केली जाते हे सुनिश्चित करण्यासाठी प्रत्येक अभ्यासक्रम धोरणात्मकरित्या विकसीत केला जातो. हे अभ्यासक्रम निवडून NEP २०२० द्वारे प्रस्तावित केलेल्या लवचिक क्रेडिट प्रणालीचा पुरेपूर लाभ घेवून विद्यार्थी आत्मविश्वासाने वैयक्तिक शिक्षण मार्ग तयार करु शकतात.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ मधील Uddyam-PAHSUI Foundation Section 8 Company अल्पमुदतीचा अभ्यासक्रम सुरु करण्याची बाब विचारार्थ. | नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठातील नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ मधील Uddyam-PAHSUI Foundation Section 8 Company अल्पमुदतीचा अभ्यासक्रम सुरु करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [२१(४)] | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०५(२) (ड) मधील तरतुदीनुसार संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठास मंजूर असलेल्या संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ या पदावर कार्यरत असलेले डॉ. सचिन श्यामसुदर लड्ढा यांनी दिलेला राजीनामा स्विकारुन त्यांना दि.२६/१०/२०२३ रोजी संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ या पदावरुन सेवामुक्त करण्यात आले आहे. त्यास अनुसरुन सदर रिक्त पदाची जाहिरात दै. लोकमत व दै. टाईम्स ऑफ इंडियाच्या दि.०६/०३/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये, दै. लोकसत्ता (एक्सप्रेस करिअर वेस्ट पॅकेज) च्या दि.०८/०३/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये, Association of Indian Universities, New Delhi यांच्या दि.११-१७ मार्च, २०२४ रोजीच्या युनिव्हर्सिटी न्युजच्या साप्ताहिकेत, विद्यापीठाच्या व महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली असून आवेदनपत्र सादर करण्याची अंतिम मुदत दि.१०/०४/२०२४ पर्यंत आहे. तसेच दि.११/०६/२०२४ रोजीच्या सूचनेन्वये सदर पदाकरीता आवेदनपत्र सादर करणेकामी दि.२५/०६/२०२४ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.<br>सदर जाहिरातीच्या अनुषंगाने विहित कार्यवाही करुन संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ या पदासाठी प्राप्त होणाऱ्या आवेदनपत्रांमधून पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घ्यावी लागणार आहे. सदर मुलाखती घेण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) मधील तरतुदीनुसार निवड समिती गठीत करावी लागणार आहे. सदर निवड समितीला अनुसरुन १०५ २) (ड) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद विहित केलेली आहे.<br>• व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाचा, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक | आस्थापना विभाग |

| | | |
|---|---|---|
| | उपरोक्त तरतुदीस अनुसरुन नामनिर्देशनाकरीता दि.२२/०३/२०२४ रोजीच्या बैठकीत विषय सादर करण्यात आला असता, व्यवस्थापन परिषदेने विषय क्रमांक ०६ अन्वये डॉ. निवृत्ती बाबुराव पवार यांचे नामनिर्देशन केले आहे. तथापि, डॉ.निवृत्ती बाबुराव पवार हे दि.३१/०५/२०२४ रोजी प्राचार्य या पदावरुन सेवानिवृत्त झाल्याने व्यवस्थापन परिषदेचे सदस्यत्वाची मुदत संपली असून त्या अनुषंगाने उक्तप्रमाणे नमूद संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ या पदाच्या निवड समितीच्या सदस्यत्वाची मुदत आपोआपच संपुष्टात आलेली आहे.<br>उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) (ड) मध्ये नमूद तरतुदीच्या अनुषंगाने संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक यांचे व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.<br>सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०५ (२) (ड) मधील तरतुदीनुसार संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब विचारार्थ. | |
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०५(२) (ड) मधील तरतुदीनुसार संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने डॉ. सुशिल कुमार शिंदे यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [२१(५)] | महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ दि.०१ मार्च, २०१७ पासून सर्व विद्यापीठांना लागू झाला आहे. त्यानुसार विद्यापीठ Common Statutes आणि Ordinance अद्यापपर्यंत प्राप्त झाले नसल्याने, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या Ordinance Framed under the provision of the act, १९९४ मधील दंडक ९(a) नुसार चेंजिस-इन-स्टाफ या समितीवर व्यवस्थापन परिषद सदस्यांमधून पाच समिती सदस्यांमधून अध्यक्षांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: विविध महाविद्यालयांकडून प्राप्त प्रस्तावांचे चेंजेस इन स्टाफच्या गठीत समितीकडून तपासणी करुन त्याची व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेवून सर्व महाविद्यालयांना कळविणे आवश्यक आहे. याबाबत दंडक ९(a० मध्ये खालीलप्रमाणे आहे.<br>०.९ (a) - The Committee on Local Inquiry Committee Reports and Changes in College Staff shall consist of five members of the Executive Council who shall hold office for three years.<br>दि.०५ मार्च, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीमध्ये विषय क्र.१५(४) ठरावानुसार दंडक ९(a) अन्वये चेंजेस इन स्टाफ पडताळणीसाठी अध्यक्ष/सदस्यांचे खालीलप्रमाणे समितीचे नामनिर्देशन करण्यात आलेले होते.<br>१) प्राचार्य डॉ. एन. बी. पवार : अध्यक्ष<br>२) डॉ. वसंत गुरुशांत कोरे : सदस्य<br>३) डॉ. प्रशांत मारुती पवार : सदस्य<br>४) डॉ. समाधान दिगंबर पवार : सदस्य<br>५) डॉ. सुशिल कुमार शिंदे : सदस्य<br>६) डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड : सदस्य<br>वर नामनिर्देशित गठीत समितीतील अध्यक्ष प्राचार्य डॉ. एन. बी. पवार हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले असल्याकारणाने नवीन अध्यक्षांचे नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ. | शिक्षक मान्यता विभाग |
| ठराव: | शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या Ordinance Framed under the provision of the act, १९९४ मधील दंडक ९(a) नुसार चेंजिस-इन-स्टाफ या समितीवर डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड यांचे अध्यक्ष म्हणून सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [२१(६)] | प्रस्तुत विद्यापीठाच्या मौजे कोंडी ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर येथील मुख्य प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन या परिसरास "विस्तारित प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन" असे नामाभिधान करण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ कर्मचारी संघटना, सोलापूर यांनी त्यांच्या दिनांक ०६/०१/२०२४ रोजीच्या पत्रान्वये सदर नवीन प्रशासकीय इमारत ही कोंडी या ग्रामीण भागात येते सध्याचे कार्यालय शहरी भागात आहे. नवीन प्रशासकीय इमारतीचा पत्ता दिल्यास कार्यालय ग्रामीण भागात जाईल परिणामी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या घरभाडे भत्ता कमी होवून आर्थिक नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे विद्यापीठ प्रशासकीय कार्यालयाचा मुख्य पत्ता न बदलण्याबाबत व ४८२ एकर मधील प्रशासकीय इमारत व परिसरास विस्तारित परिसर असे संबोधन करण्याबाबत कळविले होते.<br>त्याअनुषंगाने विस्तारित परिसर असे संबोधन करण्यासाठी अहवाल सादर करणेकामी मा. कुलगुरु महोदयांनी प्रा. डॉ. लक्ष्मीकांत ब. दामा- प्र- कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली होती. सदर समितीची बैठक दिनांक १६/०७/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. त्यानुसार सदर समितीचा बैठकीचा इतिवृत्तांत प्राप्त झाला आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठाच्या मौजे कोंडी ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर येथील मुख्य प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन या परिसरास " विस्तारित प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन" असे नामाभिधान करण्याची बाब विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठाच्या मौजे कोंडी, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर येथील मुख्य प्रशासकीय इमारत व परीक्षा भवन या परिसरास "राजमाता अहिल्यादेवी होळकर विस्तारीत प्रशासकीय व परीक्षा भवन" असे नामाभिधान करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**तसेच विद्यापीठाच्या ४८२ एकर जागेतील खेलो इंडिया अंतर्गत बांधण्यात आलेल्या मल्टीपर्पज हॉल यास "मेजर ध्यानचंद क्रीडा संकूल" हे नाव देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

श्री. सुधाकर तुकाराम सरवदे यांनी अध्यक्षांच्या परवानगीने खालीलप्रमाणे आयत्या वेळेचा विषय सादर केला

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [२१(७)] | प्रस्तुत विद्यापीठामध्ये "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्र" मंजूर करण्यात आले असून सदर अध्यासन केंद्रासाठी कृती समिती गठीत करण्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | प्रस्तुत विद्यापीठामध्ये "भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अध्यासन केंद्र" मंजूर करण्यात आले असून सदर अध्यासन केंद्रासाठी सर्वानुमते खालीलप्रमाणे कृती समिती गठीत करण्यात आली.<br>तसेच सदर समितीने अध्यासन केंद्रासाठी निधी उभारण्यास ही प्रयत्न करावे असे सर्वानुमते ठरले. | |

| अ.क्र. | समिती सदस्यांची नांवे | पदनाम |
|---|---|---|
| १) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | अध्यक्ष |
| २) | प्रा. (डॉ.) भगवान आदटराव | सदस्य |
| ३) | डॉ. टी. एस. मोरे | सदस्य |
| ४) | डॉ. एम. आर. कांबळे | सदस्य |
| ५) | डॉ. सारीपुत्र तुपेरे | सदस्य |
| ६) | डॉ. दिगंबर झोंबाडे | सदस्य |
| ७) | डॉ. चंद्रकांत चव्हाण | सदस्य |
| ८) | डॉ. पी. एन. कोळेकर | सदस्य |
| ९) | प्रा. (डॉ.) गौतम सुबण्णा कांबळे | समन्वयक |

श्री. सचिन मारुती गायकवाड यांनी अध्यक्षांच्या परवानगीने खालीलप्रमाणे आयत्या वेळेचा विषय सादर केला

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [२१(८)] | पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर आंतरमहाविद्यालयीन क्रीडा स्पर्धामध्ये तसेच अखिल भारतीय आंतर विद्यापीठ वेस्टझोन/ऑल इंडिया स्पर्धेसाठी कराटे, सॉफ्ट टेनिस व पॉवर लिफ्टिंग (मुले) या क्रीडा प्रकाराचा समावेश करण्याची बाब विचारार्थ. | क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग |
| ठराव: | सदरचा विषय क्रीडा व शारीरिक शिक्षण मंडळाकडे पाठविण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. | |

श्री. सचिन मारुती गायकवाड यांनी अध्यक्षांच्या परवानगीने खालीलप्रमाणे आयत्या वेळेचा विषय सादर केला.

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [२१(९)] | स्वराज्य रक्षक, स्वराज्य संकल्पक छत्रपती संभाजी महाराज यांचे नावाने मंजूर करण्यात आले असून सदर अध्यासन केंद्रासाठी कृती समिती गठीत करण्याची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | प्रस्तुत विद्यापीठामध्ये "स्वराज्य रक्षक, स्वराज्य संकल्पक छत्रपती संभाजी महाराज" मंजूर करण्यात आले असून सदर अध्यासन केंद्रासाठी सर्वानुमते खालीलप्रमाणे कृती समिती गठीत करण्यात आली.<br>तसेच सदर समितीने अध्यासन केंद्रासाठी निधी उभारण्यास ही प्रयत्न करावे असे सर्वानुमते ठरले. | |

| अ.क्र. | समिती सदस्यांची नांवे | पदनाम |
|---|---|---|
| १) | श्री. सचिन मारुती गायकवाड | अध्यक्ष |
| २) | डॉ. चंद्रकांत चव्हाण | सदस्य |
| ३) | डॉ. अरुण सोनकांबळे | सदस्य |
| ४) | डॉ. राजेंद्र गायकवाड | सदस्य |
| ५) | डॉ. विष्णु वाघमारे | सदस्य |
| ६) | डॉ. नेताजी कोकाटे | सदस्य |
| ७) | डॉ. सज्जन पवार | सदस्य |
| ८) | डॉ. विकास शिंदे | सदस्य |
| ९) | प्रा. (डॉ.) विकास पाटील | समन्वयक |

मा.कुलगुरु तथा अध्यक्ष यांनी खालीलप्रमाणे आयत्या वेळेचा विषय सादर केला

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [२१(१०)] | MoU Cell मध्ये व्यवस्थापन परिषद सदस्यांचा समावेश करण्याची बाब विचारार्थ. | नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ |
| ठराव: | MoU Cell मध्ये डॉ. प्रशांत मारुती पवार, प्र.अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा व श्री. सचिन मारुती गायकवाड यांची नांवे समाविष्ठ करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |

मा.कुलगुरु तथा अध्यक्ष यांनी खालीलप्रमाणे आयत्या वेळेचा विषय सादर केला

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[२१(१७)]</td><td>विद्यापीठ फंडामध्ये दरवर्षी भरघोस वाढ होण्यासाठी करावयाच्या उपाययोजना सुचविण्यासाठी “विद्यापीठ विकास योजना समिती” गठीत करण्याची बाब विचारार्थ.</td><td rowspan="2">वित्त व लेखा विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>विद्यापीठ फंडामध्ये दरवर्षी भरघोस वाढ होण्यासाठी करावयाच्या उपाययोजना सुचविण्यासाठी सर्वानुमते खालीलप्रमाणे “विद्यापीठ विकास योजना समिती” गठीत करण्यात आली.<br>
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>सदस्यांचे नाव</th><th>पदनाम</th></tr>
<tr><td>१)</td><td>श्री. सचिन मारुती गायकवाड</td><td>अध्यक्ष</td></tr>
<tr><td>२)</td><td>डॉ. प्रशांत मारुती पवार</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>३)</td><td>डॉ. सुशिल कुमार शिंदे</td><td>सदस्य</td></tr>
</table></td></tr>
</table>

मा. कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद